2920



# डॉन क्विक्झोट

BVBK-0402180

ह.ग.देवळे

नितीन प्रकाशन, पुणे 30

# डॉन क्विझोट

[ सर्व्हॅटिस याच्या विनोदी कादंबरीचे संक्षिप्त रूपान्तर ]

शं. रा. देवळे

BVBK-0402180

मूल्य रुपये सहा फक्त

नितीन प्रकाशन, पुणे ३०

मुद्रक :
म. द. कस्तुरे
महाराष्ट्र मुद्रण शाळा प्रेस
१७८६ सदाशिव पेठ
पुणे – ४११ ०३०

प्रकाशिका :
सौ. सुधा वसंत गोगटे
नितीन प्रकाशन,
११८२, सदाशिव पेठ, पुणे ३०.

**तिसरी आवृत्ती १० डिसेंबर १९८१**

*

सर्व हक्क प्रकाशिकेकडे
द्वितीयावृत्ती विजयादशमी १९७८

*



डॉन क्विक्झोट

# ओळख

डॉन क्विक्झोट ही कादंबरी सर्व जगात प्रसिद्ध आहे. इंग्रजी वाङ्मयात शेक्सपियरची नाटके जितकी मानली जातात तितकीच सर्व्हेटिसची डॉन क्विक्झोट ही कादंबरी मानली जाते. तिने साऱ्या जगातील विद्वानांना व रसिकांना हसवून सोडले आहे. शूर शिलेदारीच्या जुन्यापुराण्या व भ्रामक कल्पना डोक्यात घेऊन क्विक्झोट दुःख-निवारणाच्या मोहिमेवर निघतो आणि त्याला शहाण्या म्हणविणाऱ्या समाजातील वेडेपणा आढळतो. त्यावर लेखकाने उपरोधिक पद्धतीने, खमंग, खुसखुशीत व खुमासदार टीका केलेली आहे. ती सविस्तर वाचताना हसून हसून ज्याच्या मुरकुंड्या वळणार नाहीत, असा वाचक विरळा.

या विनोदी व उपरोधी कादंबरीचा जनक सर्व्हेटिस याचे नाव 'गलिव्हरचे प्रवास' लिहिणाऱ्या स्विफ्टइतकेच जगप्रसिद्ध आहे. त्याचा जन्म ता. ९ ऑक्टोबर १५४७ रोजी स्पेनमध्ये झाला आणि तो ता. २३ एप्रिल १६१६ रोजी मरण पावला. या ६९ वर्षांच्या आयुष्यात त्याने रणांगणावर सैनिक म्हणून काम केले आणि शत्रूकडून बंदिवान म्हणून दुःखही भोगले. इतरही नोकऱ्या त्याने केल्या व त्या करीत असताना कर्जापायी तुरुंगवास सोसला. वयाच्या सुमारे साठाव्या वर्षी त्याने डॉन क्विक्झोट ही अजरामर व अद्वितीय कादंबरी लिहिली. एका वर्षात पाच आवृत्त्या निघण्याचे भाग्य या कादंबरीच्या पूर्वार्धाला लाभले. युरोपमधील चौदा भाषांत तिची भाषान्तरे झाली आणि जपानी भाषेतही तिचा अनुवाद करण्यात आला. हिंदुस्थानी भाषेत १८९४ साली तिचे भाषान्तर झाले. मराठीतही तिने संक्षिप्त स्वरूपात प्रवेश केला. |आता बालवाङ्मयाचे नाणावलेले लेखक श्री. शं. रा. देवळे यांनी प्रस्तुत अनुवाद बहारीने केला आहे. त्यामुळे संपूर्ण क्विक्झोटच्या मराठी अवताराची वाट मराठी वाचक पाहत राहतील.

— दा. न. शिखरे

२९५० ... १५।४।६८

# सरदार बनण्याचे वेड

१

फार फार पूर्वीची गोष्ट आहे. स्पेन देशाच्या दक्षिण भागात ‘ ला मांचा ’ नावाचे एक खेडे होते. त्या खेड्यात एक माणूस राहत होता. असेल पन्नाशीच्या वयाचा ! तो शरीराने उंच, धिप्पाड आणि हाडा-पेराने दणकट होता. त्याला शिकारीला जाण्याचाही नाद होता. त्याच्या घरात सुमारे वीस वर्षे वयाची एक पुतणी, एक म्हातारी आणि एक नोकर एवढीच माणसे होती. नोकर घरकाम करायचा आणि म्हातारी काटकसरीने घर चालवायची.

त्या गृहस्थाचे नाव होते ‘ क्विझाडा ’. त्याची मिळकत थोडी होती; तरीही आपल्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा तो घरखर्चा-साठी देई, एक हिस्सा कपडे व करमणूक यांत खर्च करी आणि एक हिस्सा तो आपल्या घोड्यासाठी व शिकारी कुत्र्यांसाठी खर्च करी. क्विझाडाचा घोडा धन्यासारखाच हडकुळा होता; पण रपेटीला किंवा शिकारीला जाताना त्याला भारीच स्फुरण चढे. क्विझाडाला त्या घोड्याचा फार अभिमान वाटे.

जुन्या काळातील राजेमहाराजांच्या आणि सरदारांच्या परा-क्रमाची रोमांचकारी वर्णने वाचण्याचा क्विझाडाला भारी छंद

होता. तशी पुस्तके विकत घेण्यात त्याने आपली एक जमीनही विकली होती. त्याच्या नेहमीच्या बोलण्यात त्या सरदारांचाच विषय असायचा. त्याच्या वागण्यात सरदारांचीच ऐट आणायचा!

सरदारांच्या पराक्रमाची वर्णने वाचताना त्याला असे वाटायचे की, जणू मोठमोठे विजय मिळवून आपणच सम्राट झालो आहोत; आणि मग तो त्या धुंदीतच वागे. हे सर्व बेत प्रत्यक्ष अमलात आणावेत; हातात भाला, तरवार घेऊन, अंगात चिलखत चढवून आणि आपल्या घोड्यावर स्वार होऊन स्वारीला जावे, जगातील अन्याय दूर करावे, गांजलेल्या, पीडलेल्यांना मदत करावी आणि एक मोठा पराक्रमी वीर म्हणून कीर्ती मिळवून हिंडावे, हीच त्याची मनीषा होती.

एके दिवशी क्विझाडाने आपल्या घरातील अडगळ बाहेर काढली. त्याच्या आजोबांच्या वेळची काही शस्त्रे त्या अडगळीत गंजून पडलेली होती. एक जुनाट, गंजलेले असे चिलखत त्याला सापडले. ते त्याने घासून पुसून स्वच्छ केले. एका शिरस्त्राणाला मुखवटचाचा भाग नव्हता तो त्याने पुठ्ठ्याचा तयार केला. झाले! चिलखत, शिरस्त्राण आणि हत्यारे यांची तयारी झाली. आता सरदाराला घोडा पाहिजेच, म्हणून तो आपल्या लाडक्या घोड्याच्या तबेल्यात गेला. केवळ हाडे आणि कातडे उरलेला त्याचा तो घोडा, पण स्वारी-शिकारीत तो पूर्वीच्या सरदारांच्या घोड्यांपेक्षा जराही कमी पडणार नाही अशी खात्री क्विझाडाला वाटली; कारण तो सरदारकीचा पराक्रम गाजविण्याच्या धुंदीतच होता.

आपल्या उमद्या घोड्याला ऐटदार नाव काय बरे द्यावे, याचा विचार करून डोके खाजविण्यात त्याने चार दिवस घालविले. शेवटी 'रोझिनांट' हे जुने स्पॅनिश नाव त्याने त्या घोड्याला

दिले. मग स्वत:लाही ' डॉन क्विक्झोट ' हे तडफदार नाव त्याने धारण केले.

' डॉन क्विक्झोट डी ला मांचा ' या सरदाराला आता एक प्रिया पाहिजेच ! त्या प्रियेसाठीच आपण लढाया करायच्या, शत्रूला नामोहरम करायचे. प्रियेशिवाय सरदार म्हणजे पानाशिवाय झाड, हेच वेड त्याने घेतले. अशी एक सुंदर प्रिया निवडायची. लढाईत शत्रूला जिंकून आणून तिच्यासमोर उभे करायचे आणि मग आपणही त्या राणीचे हुकूम मान्य करायचे. पण आपली प्रिया कोण होणार, याचा त्याने खूप विचार केला. शेवटी त्याला आठवले की, आपल्या गावाशेजारच्या टोंबोसो गावातील एका शेतकऱ्याची मुलगी एकदा आपल्याला खूप आवडली होती. तिचीच निवड त्याने आपली प्रेयसी म्हणून केली. टोंबोसो गावातील आपल्या भावी राणीचे नाव ' डुल्सीनिया ' असेच ठेवायचे डॉन क्विक्झोटने ठरविले. तिच्या भेटीसाठी जाण्याची तयारी त्याने केली.

जुलै महिन्यातील एका रम्य पहाटेस तो उठला. त्याने चिलखत चढविले, शिरस्त्राण घातले आणि ' रोझिनांट ' घोड्यावर डॉन क्विक्झोट डी ला मांचा हे सरदार आपल्या डुल्सीनिया प्रियेच्या भेटीसाठी निघाले. बागेच्या मागच्या फाटकातून कोणालाही न कळविता ते मैदानावर येऊन पोहोचले.

प्रियेच्या भेटीसाठी काहीतरी पराक्रम गाजवून नंतर तिची भेट घ्यायची, शत्रूला कैद करायचे आणि तिच्यापुढे त्याला नाक घासायला लावायचे. मग ती खूष होईल असा विचार करून डॉन पुढील उद्योगाला लागला.

□ □ □

# किल्ल्यातील पहिला मुक्काम

२

डॉन घोड्यावर बसून बाहेर पडला. प्रथम सरदारकी मिळाल्याशिवाय कोणालाही युद्ध करण्याचा अधिकार मिळत नाही, असे त्याने वाचले होते. या विचाराने तो बेचैन झाला. सारा दिवस आपल्या घोड्यावर बसून त्याने रपेट केली. जगाला दिपवून टाकणारी साहसी कृत्ये करण्याचा उत्साह त्याच्या तोंडावर दिसत होता. एकीकडे तो स्वतः जगप्रसिद्ध होण्याची स्वप्ने पाहत होता तर दुसरीकडे कोणे एके काळी पाहिलेली आणि त्याला आवडलेली डुल्सीनिया त्याच्या डोळ्यांसमोर दिसत होती.

हिंडता हिंडता संध्याकाळ झाली. डॉन आणि त्याचा घोडा भुकेने थकून गेले. डॉनने दूरवर नजर टाकली. एखादा किल्ला नजरेला पडतो की काय हे तो डोळे ताणून पाहत होता. इतक्यात लांब एका बाजूला त्याला एक छोटीशी इमारत दिसली. काळोख पडण्याच्या सुमारास तो त्या इमारतीजवळ जाऊन थडकला. आपण पुस्तकात वाचल्याप्रमाणे अगदी बरोबर तशीच ही इमारत आहे असे डॉनला वाटले. हा एक भव्य किल्ला असावा. खंदक, शस्त्रागार वगैरे सर्व तरतूद तेथे आहे असे डॉनला वाटले. त्या इमारतीपासून थोड्याच अंतरावर त्याने आपला घोडा वळविला. आता लवकरच रखवालदार येऊन आपल्यासारख्या नवीन सरदाराच्या आगमनाची वर्दी देणार, अशी त्याची खात्री झाली.

तेवढ्यात कोणा एका गुराख्याने आपल्या डुकरांना जमविण्यासाठी

आणि घरी घेऊन जाण्यासाठी आपले अलगूज वाजविले. किल्ल्यावर नेमलेल्या कोणीतरी माणसाने आपल्या आगमनाची सूचना देण्यासाठीच ते अलगूज वाजविले असे डॉनला वाटले आणि तो ताबडतोब त्या इमारतीच्या फाटकाजवळ गेला. तेथे उतरलेल्या लोकांबरोबर आलेल्या दोन स्त्रिया दारात उभ्या असलेल्या त्याला दिसल्या.

सरदार डॉन क्विक्झोट दाराशी थांबताच त्यांची उंच व चिलखत घातलेली मूर्ती, तसेच त्यांच्या हातातील ढाल-तलवार, भाला या गोष्टी पाहताच त्या दोघी घाबरल्या आणि एकदम आत पळून जाऊ लागल्या. त्याबरोबर डॉन त्यांना म्हणाला, " थांबा, थांबा, आत पळून जाऊ नका. भिण्याचे काहीच कारण नाही. माझी ही सरदारकी जगातील कोणत्याही निरुपद्रवी व्यक्तीच्या केसालाही धक्का लावणार नाही. तुमच्यासारख्या स्त्रियांना तर भिण्याचे मुळीच कारण नाही."

इतक्या आदबीने आपल्याशी बोलणाऱ्या या गंभीर माणसाला भिण्याचे काहीच कारण नाही अशी खात्री पटून त्या दोन्ही स्त्रिया मागे फिरल्या. त्यांनी ती सरदारांची मूर्ती अगदी नखशिखान्त न्याहाळली. पण त्याचा तो विचित्र पोशाख पाहून त्यांना हसू आवरेना. तोंडावर हात ठेवून त्या हसू लागल्या. या स्त्रिया आपली टवाळी करीत आहेत, हे डॉनच्या लक्षात आले. तो म्हणाला, "हे स्त्रियांनो, तुम्हांला दुखविण्याची माझी मुळीच इच्छा नाही. उलट तुमची होईल तितकी सेवाच मला करावयाची आहे. तुमच्यासारख्या सुंदर स्त्रियांना नम्रता शोभून दिसते. मी तुमचा एक विश्वासू आणि स्वेच्छेने झालेला सेवक आहे असे समजा."

डॉनच्या या बोलण्यावर त्या दोघींही एकमेकींकडे पाहून मोठ-

मोठ्याने हसू लागल्या. त्यामुळे त्या इमारतीमधील उपाहार गृहाचा मालक काय गडबड आहे हे पाहण्यासाठी बाहेर आला. हा मालक सावळ्या रंगाचा, कमी उंचीचा आणि सागरगोट्यासारखा गरगरीत दिसणारा एक स्थूल मनुष्य होता. तो सुस्वभावी आणि हसतमुख होता. थोडक्यात म्हणजे डॉनच्या अगदी विरुद्ध प्रकार! त्या चमत्कारिक सरदाराला पाहिल्यावर आपणही त्या स्त्रियांच्या हसण्यात भाग घ्यावा असेही त्याला वाटू लागले. पण लष्करी पोशाखातल्या त्या उंच्यापुऱ्या सरदाराकडे पाहून तो थोडासा हबकलाच. तो म्हणाला, "नमस्ते सरदारसाहेब, आपण जर आज वस्तीला इथे राहिलात तर मला आनंद वाटेल. तुमची इथे अगदी उत्तम व्यवस्था होईल. इथे आपल्याला सर्व काही मुबलक मिळेल. पण झोपण्यासाठी इथे पलंग मात्र नाही."

या किल्ल्यातील हाच मुख्य अधिकारी आहे या समजुतीने डॉन म्हणाला, "हवालदारसाहेब, मी अगदी अल्पसंतुष्ट आहे. शस्त्रास्त्रे आणि रणांगण यांनाच मी सर्वांत जास्त मानतो......" एवढे बोलता बोलता डॉन घोड्यावरून खाली उतरला. घोड्यावरून खाली उतरताना त्या सावळ्या माणसाने त्याला हात देऊन उतरण्यास मदत केली. डॉनने आपला घोडा त्या मालकाच्या स्वाधीन केला. त्या दोन स्त्रियांनी त्या सरदाराचे चिलखत वगैरे काढण्यास सुरुवात केली. पण सरदाराच्या डोक्यावर पक्के बसलेले शिरस्त्राण मात्र त्यांना काही केल्या काढता येईना. हिरव्या रिबिनीने ते घट्ट बांधले होते.गाठी अगदी पक्क्या बसल्या होत्या आणि रिबिन तोडण्यास डॉन तयार नव्हता. म्हणून तो ते आपल्या डोक्याला तसेच राहू देण्यास सांगत होता. त्यामुळे तो विचित्र दिसत होता. त्या स्त्रियांनी आपल्याला मदत केल्याबद्दल डॉनला

धन्यता वाटली. त्याने त्यांचे आभार मानले आणि 'थोड्याच दिवसांत आपण पराक्रम गाजवून आल्यावर याची फेड करून टाकू,' असे त्यांना आश्वासन दिले.

असल्या प्रकारची भाषा त्या स्त्रियांनी कधीच ऐकलेली नव्हती. डॉनचे बोलणे संपल्यावर त्याच्या खाण्यापिण्याची त्यांनी चौकशी केली. सारा दिवस उपाशी असल्याने डॉनलाही कडकडीत भूक लागली होती. त्याने तावडतोब खाण्यासाठी काहीतरी आणण्यास सांगितले.

लवकरच जाडीभरडी शिळी भाकरी व सुकलेली मासळी असे अन्न डॉनसाठी त्यांनी आणले. तोंडावरचा मुखवटा आड येत असल्याने त्याला नीट खाता येत नव्हते. पक्षी जसे आपल्या पिलांना खायला घालतात किंवा आया आपल्या मुलांना भरवितात, तसे डॉनला ते अन्न भरविण्यात आले. नंतर उपाहारगृहाच्या मालकाने एका ग्लासमध्ये कसले तरी पेय आणले. त्यात एक नळी बुडविली आणि त्या नळीचे दुसरे तोंड डॉनच्या ओठात दिले.

इतक्यात उपाहारगृहाच्या बाहेरून कसला तरी आवाज आला. पूर्वीसारखाच कोणीतरी मुलगा आपली डुकरे गोळा करण्यासाठी अलगूज वाजवीत होता. पण डॉनला वाटले, पाहुणे जेवत असताना त्यांना रंजविण्याचा हा प्रकार असावा. आपण एका किल्ल्यात असून आपल्यासारख्या सरदाराचा इतमाम उत्तम प्रकारे ठेवला जात आहे, अशी डॉनची समजूत झाली. इतके झाले तरी आपणास कोणाकडून तरी सरदारकी मिळाल्याशिवाय आपल्याला पराक्रम गाजविण्यासाठी पुढे जाता येणार नाही, हे शल्य डॉनच्या मनाला सारख लागून राहिले होते.

□ □ □

# सरदारकी मिळाली !

३ आपण अद्याप सरदार नाही या विचाराने डॉनला जेवणसुद्धा नीटसे सुचले नाही. जेवण कसेबसे उरकल्यावर ही आपली चूक थोडासुद्धा उशीर न लावता सुधारायची असे त्याने ठरविले आणि तो त्या तयारीला लागलासुद्धा. डॉन तबेल्याकडे निघाला. आपल्याबरोबर त्याने उपाहारगृहाच्या मालकाला बोलाविले. तबेल्याजवळ गेल्याबरोबर डॉनने मालकाचा हात हातात घेतला. त्याच्यासमोर नम्रतेनें गुडघे टेकले व तो म्हणाला, "किल्लेदारसाहेब, आपण माझी एक विनंती मान्य केल्याशिवाय मी येथून उठणार नाही."

वेडगळासारखा वागणारा डॉनसारखा हा पाहुणा त्या उपाहारगृहाच्या मालकाला प्रथमच भेटला होता. हा कसली विनंती करणार आणि त्यावर उत्तर काय द्यावे, याचे मालकाला मोठेच कोडे पडले. हा एक डोकेफिरू मनुष्य दिसतो आहे, असे समजून त्याने त्याची विनंती मान्य केली.

डॉन म्हणाला, "आपण थोडा कमीपणा घेऊनही माझी विनंती मान्य केलीत, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. उद्या आपण मला सरदारकीची दीक्षा द्यावी, इतकीच माझी विनंती आहे. आज रात्री आपल्या शस्त्रागारात मी आपली शस्त्रे ठेवतो आणि त्यावर अखंड पहारा करतो. सकाळी मला आपण सरदारकी दिलीत की मी योग्य इतमामाने बाहेर पडेन आणि जगातील कोपरा नि कोपरा हिंडून पराक्रम करीन आणि माझे नाव गाजवून दाखवीन."

यावर उपाहारगृहाचा तो मालक म्हणाला, "तुमची विनंती

अगदी कोणीही मान्य करावी अशीच आहे. पण आमच्या या किल्ल्यात वेगळे असे शस्त्रागार नाही. पूर्वीचे एक शस्त्रागार होते, ते आता जमीनदोस्त झाले. पण मी तुमची काहीतरी सोय करतोच. दुसऱ्या एखाद्या योग्य ठिकाणी तुमची शस्त्रे ठेवून मी तुमची व्यवस्था करतो. तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही आपल्या शस्त्रांवर रात्रभर पहारा करा. सकाळी योग्य वेळी मी तुम्हांला सरदारकी देण्याची व्यवस्था करीन. पण त्यापूर्वी मी तुम्हांला एक गोष्ट विचारू का ? "

" हो, हो, अवश्य. " डॉन म्हणाला.

" तुमच्याजवळ काही पैसे आहेत का ? " मालकानें विचारले.

" छे, छे ! माझ्याजवळ एक पैसाही नाही. जुन्या पराक्रमी वीरांच्या गोष्टीत ते सरदार आपल्याबरोबर पैसे बाळगीत असे मी कोठेच वाचले नाही. " डॉन म्हणाला.

मालक म्हणाला, " नाही, सरदारसाहेब, मोठी चूक झाली आहे तुमची ! त्या वीरांजवळ पैसे नसतील, पण ते त्यांच्याबरोबर असलेल्या हुजऱ्याजवळ नेहमी आपल्याजवळचे पैसे एका थैलीत ठेवीत. त्या पद्धतीप्रमाणें यापुढे बरोबर हुजऱ्या, त्याच्याजवळ पैशांचा कसा, स्वच्छ कपड्यांच्या संचाचे गाठोडे आणि इतर जरुरीच्या वस्तू घेतल्याशिवाय बाहेर पडत जाऊ नका. "

डॉनने या सर्व गोष्टी कबूल केल्या. शस्त्रे नीट ठेवून त्यांवर पहारा करण्याच्या तयारीला तो लागला. त्या उपाहारगृहाच्या अंगणात घोड्यांना आणि इतर जनावरांना पिण्यासाठी एका पन्हाळीत पाणी ठेवण्याची व्यवस्था केली होती. आपली शस्त्रे ठेवण्यास हे ठिकाण चांगले आहे असे वाटून डॉनने आपल्या चिलखताची घडी त्या पन्हाळीच्या आणि विहिरीच्या मधल्या

ओटयावर राहील अशी ठेवली. नंतर पट्टा चढवून आणि भाला हातात घेऊन गंभीर चेहऱ्याने तेथे मागेपुढे फिरत त्याने पहारा करण्यास सुरुवात केली.

मालकाने तेथील सर्व लोकांना या विचित्र वल्लीबद्दल कल्पना दिली. ते लोकही कुतूहलाने आसपास उभे राहून त्याचा पहारा पाहत होते. चांदण्यात ते दृश्य मोठे गमतीचे दिसत होते. पहारा चालू असतानाच डॉन मध्येच थांबे आणि त्या चिलखताकडे टक लावून पाहत उभा राही. रात्र होऊ लागली. तेवढयात एक शेतकरी आपल्या खेचरांना पाणी पाजायला तेथे घेऊन आला. पण तेथे सरदारसाहेबांचा पहारा चालला होता. पन्हाळीजवळच्या ओटयावरच डॉनने चिलखत ठेविले होते. ते चिलखत तेथून हलवल्यावाचून खेचरांना पाणी पाजणे शक्य नव्हते. तो माणूस जसजसा जवळ येऊ लागला, तसतसा डॉन त्याच्याकडे रोखून पाहू लागला. शेवटी डॉन ओरडून म्हणाला, " खबरदार ! मूर्खा, कोण आहेस तू ? ज्याची मरायची इच्छा असेल त्यानेच या शस्त्रांना हात लावावा. "

डॉनच्या या बोलण्याकडे त्या माणसाने लक्ष दिले नाही. त्याने ते चिलखत उचलले आणि बाजूला भिरकावून दिले. हे पाहून डॉनने आपला भाला उगारला. एकदा आकाशाकडे नजर टाकून तो पुटपुटला, " प्रिय डुलसीनिया, माझ्या मदतीला ये आणि माझ्या या पहिल्या पराक्रमात मला यशस्वी कर. " इतके बोलून डॉनने आपला भाला त्या शेतकऱ्याच्या अंगावर फेकला. बिचारा धाडकन जमिनीवर कोसळला. डॉनने आपले चिलखत नीट घडी करून होते तसे पन्हाळयाच्या ओटयावर आणून ठेविले आणि पुन्हा आपला पहारा सुरू केला.

लवकरच दुसरा एक माणूस आपल्या खेचरांचा पाणी पाजायला आला. तो चिलखताला हात लावणार, तोच डॉनने त्याला भाल्याने खाली पाडले. जखमी झाल्याने तोही बिचारा मोठमोठ्याने ओरडू लागला. ती आरडाओरड ऐकून लोकांनी गर्दी केली. मालकही जागा होऊन गडबडीने आला. लोकांनी केलेली गर्दी पाहून डॉनने आपली तलवार उपसली आणि आपल्या प्रियेच्या नावाचा पुन्हा एकदा पुकारा केला. जमलेल्या लोकांनी डॉनवर दगडांच वर्षाव सुरू केला. डॉन आपली ढाल पुढे करून मोठ्या धिटाईने त्या सर्वांसमोर उभा राहिला. रात्रीच्या चांदण्यात तो भयंकर दिसत होता.

उपाहारगृहाचा मालक म्हणाला, " जाऊ द्या त्याला. तो एक विचित्र मनुष्य आहे. हे मी तुम्हांला प्रथमच सांगितले नाही का ? त्याच्या नादी लागू नका." मग सर्व लोक हळूहळू तेथून निघून गेले. लोक निघून गेल्यावर त्यांच्याकडे हातवारे करीत डॉन म्हणाला, "तुम्ही सगळे दुष्ट आहात, नीच आहात आणि येथील किल्लेदारही भित्रा आहे."

उपाहारगृहाच्या मालकाने जखमी लोकांना आपल्या उपाहार-गृहात नेले आणि त्यांच्यावर उपचार केले. इकडे डॉनचा पहारा पूर्ववत चालू झाला. या त्रासदायक पाहुण्यापासून आपली सुटका कशी करायची याची चिंता उपाहारगृहाच्या मालकाला पडली. त्या वेड्याला एकदा सरदारकी बहाल करून ही पीडा येथून घालवून द्यावी असे त्याने ठरविले. तो डॉनकडे गेला. झालेल्या प्रकाराबद्दल त्याने डॉनची क्षमा मागितली. या गोष्टीला आपली काडीचीही संमती नव्हती, असे त्याने डॉनला सांगितले.

सरदार बनण्याची डॉनला घाई झाली होती. सरदारकी देण्याचा

समारंभ लवकर उरकून घेण्याची त्यानें किल्लेदाराला घाई लावली. डॉन म्हणाला, "मी एकदा सरदार बनलो की पाहा कसा पराक्रम दाखवतो तो ! या तुमच्या किल्ल्यातील एकही माणूस माझ्या हातून जिवंत सुटणार नाही. फक्त तुम्ही सांगाल त्यालाच केवळ तुमच्या विनंतीसाठी म्हणून मी जीवदान देईन."



डॉन म्हणजे भलत्याच कल्पना डोक्यात घेतलेला एक विलक्षण माणूस होता. तो खरोखरच काही अनन्वित गोष्टी करून दाखवील अशी भीती वाटून मालकाने ताबडतोब जमाखर्चाची एक जाड चोपडी आणली. मालकाच्या पुढे एक मुलगा मेणबत्ती घेऊन येत होता त्या मुलाच्या मागोमाग उपाहारगृहात उतरलेल्या दोन स्त्रियाही हळहळू येत होत्या. ही सर्व मंडळी डॉनजवळ येऊन

ठेपल्यावर मालकाने डॉनला गुडघे टेकून उभे राहण्यास सांगितले. त्यानें आपली जाड चोपडी उघडली. तिच्यात पाहून काही मंत्र पुटपुटण्यास आणि एकीकडे ठेका धरण्यास सुरुवात केली. नंतर त्याने डॉनच्या मानेखाली खांद्यावर तलवारीने स्पर्श केला. त्या स्त्रियांपैकी एकीने डॉनच्या म्यानात ती तलवार अडकविली. हा समारंभ चाल असताना त्या स्त्रिया मनातल्या मनात हसत होत्या.

सरदारकी मिळाल्यावर डॉननें सर्वांचे आभार मानले. आनंदाच्या भरात त्याने उपाहारगृहाच्या मालकाला मिठी मारली. नंतर तो घोड्यावर स्वार झाला आणि सूर्योदय होण्याच्या पूर्वीच पराक्रम गाजविण्यासाठी बाहेर पडला. अभिमान आणि आनंद यांनी डॉनचे मन जणू ओसंडून चालले होते.

□ □ □

## पराभव म्हणजे पुढील यशाचा पाया

४

आता मात्र आपण खरेखुरे सरदार झालो या आनंदात डॉन भल्या पहाटेच्याच वेळी त्या उपाहारगृहातून, किंवा डॉनच्या समजुतीप्रमाणे त्या किल्ल्यातून बाहेर पडला. थोडे तरी पैसे आणि स्वच्छ कपड्यांची पेटी आणि बरोबर एखादा हुजऱ्याही आपण घेतला पाहिजे. जुन्या सरदारांची स्वतःबरोबर असा नोकर नेण्याची पद्धत होती, असे कुठेतरी वाचलेले त्याला आता आठवू लागले. डॉनच्या घराशेजारीच एक गरीब माणूस राहत होता. तो मोल-

मजुरी करून कसेबसे आपले पोट भरी. आपल्याबरोबर हुजऱ्या म्हणून यायला हा माणूस तयार होईल, हे डॉनने ओळखले.

आपला धनी घराकडे वळला आहे हे घोड्याच्या लक्षात येताच तो जोराने दौडू लागला. डॉन आता दोन मैल अंतर दौडत आला असेल, तोच त्याला एक व्यापाऱ्यांचे टोळके भेटले. हे व्यापारी स्पेनच्या दक्षिण भागातील मर्सीआ शहरी रेशीम-खरेदीसाठी निघाले होते. ते सात-आठजण होते. आपल्यासारखेच पराक्रम गाजवायला निघालेले हे कोणीतरी सरदार असावेत असे डॉनला वाटले. त्यांना अडविण्यासाठी डॉनने आपला घोडा पुढे घातला. आपला भाला त्यांच्या दिशेने उगारून डॉन ओरडला, " तुम्हांला पुढे जायचे असेल तर मी काय म्हणतो ते लक्षात घ्या. ला मांचा येथील सम्राज्ञी डुलसीनिया-डेल-टोंबोसो ही अत्यंत मोहक असून ती सर्व जगात सुंदर आहे असे प्रथम माझ्यासमोर कबूल करा. तसं बोलून दाखवा......"

हडकुळ्या घोड्यावर बसलेल्या विचित्र पोशाखातील त्या वेडगळ सरदाराकडे ते सगळे व्यापारी टकमका पाहू लागले. या सरदाराची म्हणजे डॉनची गंमत करण्यासाठी एकजण पुढे आला आणि धारिष्ट करून म्हणाला, "सरदारसाहेब, तुम्ही ज्या स्त्रीबद्दल बोलत आहा, ती आम्ही पाहिलेली नाही. ती जर आम्हांला पाहायला मिळेल, आणि जर तुम्ही सांगता त्याप्रमाणे खरोखरीच आम्हांला सुंदर वाटेल, तर आम्ही तसं कबूल करू." त्यावर डॉन म्हणाला, "तिला तुमच्यापुढे आणून उभी केल्यावर मग तुम्ही ती सुंदर आहे हे कबूल करण्यात काय अर्थ आहे ? त्या वेळी समक्ष ती तुमच्या डोळ्यांसमोर दिसेलच. तिला न पाहता हे तुम्हांला कबूल केले पाहिजे. माझे म्हणणे तुम्ही नाकबूल करीत असाल, तर मी तुम्हा

सर्वांना युद्धाचे आव्हान देतो. चला, एकेकजण माझ्याबरोबर द्वंद्व-युद्धाला सज्ज व्हा. ”

त्या व्यापाऱ्यांना युद्ध किंवा मारामारी करण्याची मुळीच इच्छा नव्हती. भडकलेल्या डॉनला शांत करण्याच्या इच्छेने त्यांच्या-पैकी एकजण म्हणाला, “सरदारसाहेब, तुम्ही म्हणता त्या स्त्रीचा निदान फोटो तरी आम्हांला दाखवा. मग ती तुमची प्रेयसी एका डोळ्यानें आंधळी जरी असली, तरी तुम्हांला खूष करण्यासाठी तुम्ही म्हणाल ती गोष्ट आम्ही कबूल करू. ”

“ दुष्टांनो, तिच्या डोळयांत यत्किंचितही खोड नाही, ” असे म्हणून डॉन संतापाने अधिकच ओरडला, ‘ तिचे दोन्ही डोळे शाबूत आहेत, तुम्ही तिचा अपमान करीत आहात. याबद्दल मात्र तुम्हांला आता शासन करावे लागेल. ” असे बोलून डॉनने भाल्याचा नेम त्या व्यापाऱ्यांवर धरला आणि आपल्या घोडयाला टाच मारली. तो व्यापारी आता जखमीच झाला असता. पण डॉनचा तो हडकुळा रोझीनांट घोडा चाल करून जाताना अडखळला आणि कोलमडून खाली पडला. त्यासरशी डॉन घोडयावरून गडगडत खाली आला. अंगावरचे जड चिलखत, शिरस्त्राण आणि भाला इत्यादींच्या वजनामुळे त्याला धड लवकर उठताही येईना. तेथूनच ओरडून तो म्हणाला, “ भ्याडांनो, पळता का असे ? मी पडलो म्हणजे माझ्या अंगात दम नाही, असे समजता की काय ? हा माझ्या घोडयाचा अपराध आहे...... ”

त्या व्यापाऱ्यांपैकी एकाला डॉनच्या बोलण्याची मोठी गंमत वाटली. तो तरातरा डॉनकडे गेला आणि त्यानें डॉनच्या बरगडयां-वर चार-पाच लाथा हाणल्या. डॉनच्या हातातला भाला घेऊन त्याने दोन तुकडे केले. त्यांतल्या एका तुकडयाने तो डॉनची

चांगलीच कणीक तिंबणार होता. पण इतर व्यापारी मध्ये पडल्या-मुळेच डॉन या प्रसंगातून वाचला. तरीही तो पडल्यापडल्या ओरडतच होता, " शेवटी भ्याडासारखा पळालाच की नाही ? "

सारे व्यापारी डॉनला तेथेच टाकून निघून गेले. पडल्या पडल्याच त्याला पूर्वी पुस्तकात वाचलेले एक वाक्य आठवले : ' पराभव हा पुढील यशाचा पाया आहे. ' या वाक्यावर भरंवसा ठेवून डॉन उठून बसला. या संकटातला सगळा दोष त्याने आपल्या घोड्याला दिला. इतक्यात त्याचे लक्ष समोरून येणाऱ्या



एका व्यक्तीकडे गेले. त्याच्या खेड्यातील एक माणूस आपले गाढव घेऊन जवळूनच चालला होता. एकीकडे काहीतरी पुटपुटत आणि एकीकडे कण्हत असलेले हे सरदारसाहेब त्याला दिसले. तो जवळ

आला, तरीही डॉन त्याच्याशी काही बोलेना. काहीतरी कारण तो अजून त्या सरदारांच्या वाचलेल्या पराक्रमांच्या तंद्रीतच होता.

गाढवावरचा तो माणूस चकित झाला. डॉनच्या चेहऱ्यावरील तो मुखवटा त्यानें बाजूला केला. त्या मुखवटयाचे आता फाटून, तुटून तुकडे झाले होते. चेहऱ्यावरचा धुरळा झटकल्यानंतर, त्याने डॉनला ओळखले. तो म्हणाला, " काय हो ओळखलं का मला ? आणि हे काय ? तुमची ही अशी अवस्था कशानं झाली ? "

डॉन क्विक्झोट अद्यापि आपल्या तंद्रीतच होता. तो काहीही बोलला नाही. तो कधीतरी पुस्तकात वाचलेल्या पराक्रमाच्या कथा पुटपुटत होता. शेवटी त्या माणसाने डॉनला हलकेच उठवले आणि त्याला कसेबसे आपल्या गाढवावर बसवले. त्याने डॉनचे मोडके चिलखत, भाल्याचे तुकडे गोळा केले, एकत्र बांधले आणि त्याच्या घोडयावर ठेवले. घोडयाचा लगाम धरून आणि गाढवाला व डॉनला घेऊन तो माणूस हळूहळू खेडयाकडे निघाला. सूर्यास्ताच्या सुमारास तो खेडयात येऊन पोचला; पण तो सारा देखावा लोकांच्या दृष्टीला पडून डॉनची जास्तच फजिती होऊ नये म्हणून हळूहळू मुद्दामच काळोख करून त्यानें डॉनला घरी नेले.

डॉनच्या घरी सर्व घडी विघडूनच गेली होती. म्हातारी तर रडतच होती. पुतणीने डॉनला शोधण्यासाठी त्रिखंड धुंडिले होते, पण तिचे सारे शोधणे फुकट गेले होते. डॉन क्विक्झोट अशा प्रकारे एकाएकी अदृश्य होण्याचें काय कारण असावे, हे कोणासच कळेना. काहीतरी साहस करून दाखविण्यासाठी तो घोडयावरून बाहेर पडला असावा, असा शेवटी लोकांनी अंदाज केला; कारण डॉनच्या बोलण्यात तसे विचार पुष्कळ वेळा आले होते. डॉनचा

घोडा, त्याचा भाला, त्याची ढाल आणि त्याचे चिलखत या वस्तूही घरात दिसत नव्हत्या. अनेक पराक्रमी सरदारांची चरित्रे त्याने वाचली होती. पुस्तके वाचता वाचता कधीकधी तर कंबरेची तलवार उपसून तो भिंतीवरच वार करू लागे. ही गोष्ट डॉनच्या पुतणीने पुष्कळ वेळा पाहिली होती.

डॉनला घेऊन तो माणूस घराच्या दाराशी परत आला. त्याला पाहून सारेजण चकित झाले. सगळेजण त्याच्याभोवती गोळा झाले आणि नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून त्यांनी डॉनला भंडावून सोडले. घरातली म्हातारी म्हणाली, "हा सारा ती लठ्ठ–लठ्ठ पुस्तके वाचल्याचा परिणाम आहे. चला, थोडी विश्रांती घेतली म्हणजे तुम्ही बरे व्हाल."

सर्वांनी डॉनला बिछान्यावर निजवले. बिछान्यावर पडताच डॉनला झोपेची गुंगी आली. झोपेतही तो त्या पुस्तकात वाचलेल्या प्राचीन सरदारांच्या पराक्रमांची स्वप्ने पाहात होता.

## राक्षसांशी लढाई

५ बसलेल्या जबरदस्त माराने डॉन आता पडून राहिला होता. त्याचा मित्र त्या गावचा पाटील, निकोलस नावाचा न्हावी, त्याची पुतणी आणि ती म्हातारी यांनी एक उद्योग केला. तो म्हणजे त्यांनी घरातली रोमांचकारी कथांची सारी जुनी पुस्तके जाळून टाकली. पुस्तकेच

नाहीशी करून टाकली म्हणजे त्याचे वाचन बंद होईल आणि डॉनचा मेंदू ठिकाणावर येईल. डॉन झोपलेला असता त्याच्या त्या वाचनालयातून मोठमोठी पुस्तके खिडकीतून बाहेर फेकण्यात आली. अंगणात पुस्तकांचा एक ढीग केला आणि होळीसारखा पेटवून दिला. मात्र ही गोष्ट डॉन याच्या लक्षात येईल, तेव्हा काय होईल व त्यावर आपण काय करायचे याचा सर्वांनी विचार करून ठेवला.

काही दिवसांनी डॉनला जरा बरे वाटू लागले. तो हिंडूफिरू लागला. प्रथम डॉन आपल्या आवडत्या वाचनाच्या खोलीत निघाला. पण डॉनची पुतणी आणि म्हातारी या सर्वांनी मिळून त्या खोलीपुढे एक भिंत घालून टाकल्यामुळे ती खोलीच आता बंद झाली होती. काही दिवसांनी, आपल्या पुस्तकाच्या खोलीचे काय झाले, याची डॉनने पुतणीजवळ चौकशी केली. पुतणी घाबरली; पण मोठ्या धीराने म्हणाली, "काका, ती एक मोठीच कथा आहे ! तुमची पुस्तकांची खोलीच नाहीशी झाली आहे. कोणी-तरी एक चेटूक करणारा माणूस तुमच्या खोलीत येऊन बसत असे. तो खिडकीतून खोलीत शिरे आणि तसाच बाहेर जाई. एके दिवशी चमत्कार झाला. आम्ही तिकडे गेलो तर तो माणूस नुकताच बाहेर पडला होता. तेथे धूरच धूर झाला होता. आम्ही पाहातो तर तुमची पुस्तकांची खोली आणि पुस्तके कशाचाच तेथे ठावठिकाणा नव्हता."

पुतणीने केलेल्या खुलाशाने डॉनचे समाधान झाले. तो दातओठ खाऊन म्हणाला, "होय ना ? मला वाटलेच. तो माणूस म्हणजे ग्रीसमधील चेटक्या फरेस्टन असला पाहिजे. तो माझा एक मोठा शत्रू आहे !"

यानंतर सुमारे पंधरा दिवस डॉन क्विक्झोट घरीच होता. या

काळात तो अगदी शांत दिसत असल्याने त्याच्या डोक्यातील वेड गेले असावे, असे दिसत होते. या काळात, त्याच्या शेजारीच राहणाऱ्या एका गरीब व शेतमजुरी करणाऱ्या माणसाशी डॉनने मैत्री जोडली. हा माणूस अतिशय मेहनती आणि दुसऱ्याने सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवणारा होता. त्याच्याशी बोलता बोलता डॉनने पुढे मिळणाऱ्या वैभवाचे इतके सुंदर चित्र उभे केले आणि त्याला इतकी आश्वासने दिली की, डॉन-बरोबर हुजऱ्या म्हणून यायला तो कबूल झाला. पराक्रम करून एखादे बेटच काबीज करावयाचे आणि ते बेट त्या हुजऱ्याच्या स्वाधीन करून टाकायचे, असे डॉनने त्याला आश्वासन दिले. त्या गरीब माणसाचे नाव 'सँको पांझा' असे होते. सँकोला या सगळ्या गोष्टींचा लोभ सुटला. तो आपल्या बायकामुलांना टाकून डॉन-बरोबर यायला तयार झाला.

नंतर आपल्या प्रवासाची तयारी करून डॉन आणि सँको पांझा दोघेही भल्या पहाटेच घराबाहेर पडले. दोघांनीही आपल्या घरात कोणालाही काहीच सांगितले नाही. सूर्य उगवण्याच्या सुमारास ते दोघेजण आपल्या गावापासून बरेच लांब जाऊन पोहोचले. आपला पाठलाग कोणी करीत नाही याची त्या दोघांना खात्री झाली. आपण पुढे एक बडे असामी होणार या आनंदात सँकोपांझाची स्वारी डॉनच्या मागून डौलात जात होती. वाटेत त्यांना बऱ्याच पवनचक्क्या दिसल्या. त्यांची पाती गरगर फिरत होती. डॉनला वाटले, ते भलेमोठे राक्षसच आहेत, आणि ते आपणावर चाल करून येत आहेत. डॉन दौडतच त्या राक्षसांवर धावून गेला. डॉनने त्यांच्याशी युद्ध सुरू केले. त्याचा परिणाम एवढाच झाला की, त्याच्या भाल्याचे दोन तुकडे

झाले, त्याच्या तोंडावरील शिरस्त्राण दुसरीकडे उडाले. तो घोड्यावरून खाली पडला, घोडा दुसरीकडे दौडत निघून गेला; आणि डॉनला मात्र खूपच मुका मार बसला.

□ □ □

## रानात मिळालेली मेजवानी

६

आपल्याला आलेल्या या खडतर अनुभवाची चर्चा करीत डॉन आणि सँको असे दोघेजण पुढेपुढे चालले होते. आता आपल्याला काहीतरी खाण्याची व्यवस्था केली पाहिजे याची सँकोने त्याला आठवण करून दिली. त्यावर डॉन जोरात मान हलवीत म्हणाला, "नको, नको, या क्षणाला मला काहीही खाण्याची किंवा पिण्याची इच्छा नाही. तुला हवे असेल तर तू खाऊन घे."

आपल्या सरदारसाहेबांची परवानगी मिळाल्यावर सँकोने गाढवावरची आपली बैठक सावरली आणि बरोबर आणलेले पावाचे काही तुकडे खाल्ले.

जसजशी रात्र होऊ लागली तसतशी डॉनला भूक लागू लागली. तो सँकोला म्हणाला, "सँको, तुला मिळणाऱ्या राज्याची तू मुळीच काळजी करू नकोस. योग्य वेळ येताच तुला राज्य मिळणारच ! बरं पण आता आपल्याजवळ आणलेल्या वस्तूंपैकी खायला काही शिल्लक उरले आहे की नाही ते पाहा. आणि आता आपल्याला रात्री मुक्कामाला राहाण्यासाठी एखादा किल्ला

जवळपास दिसतो आहे का, तेही पाहा."

सँको म्हणाला, " माझ्याजवळ आता काही पावाचे तुकडे, थोडासा खवा आणि एक कांदा एवढेच काय ते खाण्याचे जिन्नस शिल्लक आहेत. पण आपल्यासारख्या पराक्रमी सरदाराला हे असले उरलेसुरले अन्न देण्याचा मला धीर होत नाही."

सँकोने आपल्याजवळच्या पिशव्या चाचपून आणखीन काही मिळते का, ते पाहिले. इतक्यात डॉन त्याला म्हणाला, " सँको, माझ्यासारख्या पराक्रमी सरदाराची किंमत तुला बरोबर कळाली. आमच्यासारखे भटकणारे शूर सरदार प्रसंगी महिना महिना काहीही न खाता राहतात. खाणे हे त्यांचे ध्येय नसते. भुकेच्या वेळी, जे त्यांच्या हाती येईल त्यावर ते आपली भूक भागवितात. जुन्या काळातल्या सरदारांच्या गोष्टी तू वाचल्यास तर तुला ही गोष्ट जागोजाग आढळून येईल. तेव्हा तुझ्याजवळ जे पदार्थ शिल्लक असतील, ते संकोच न करता मला दे."

डॉनचे हे बोलणे ऐकून सँकोने पिशवीतले पावाचे तुकडे, उरलेला खवा आणि कांदा बाहेर काढला आणि दोघांनी मोठ्या आनंदाने फराळ केला. आता काळोख जास्तच वाढू लागला. पण थोड्याच वेळात रस्त्याच्या कडेला काहीतरी हालचाल त्यांना दिसली. आणि कसली तरी कुजबूज त्यांना ऐकू आली. थोडे पुढे जाऊन पाहातात, तर ते धनगरांचे एक टोळके होते. या लोकांच्या मध्येच राहून ही रात्र काढण्याचे दोघांनी ठरविले. ती खडकाळ जागा, पलंग आणि बिछाना तर काहीच नाही, हा विचार मनात येऊन सँकोला वाईट वाटले. पण निरनिराळ्या अडचणींतून जाणे हीच खऱ्या सरदारांची कसोटी असते, हे लक्षात येऊन डॉनला एक प्रकारची हुषारीच वाटली.

डॉन आणि सँको यांना पाहताच हे कोणीतरी बडे सरदार असावेत, असे वाटून धनगरांनी त्यांचे स्वागत केले. त्या धनगरांनी एक भली थोरली चामड्याची बैठक पसरली. डॉनला आणि सँकोला आपल्याबरोबर जेवणासाठी त्यांनी बोलावले.

त्या धनगरांनी एक पत्रावळीसारखे चामडे डॉनपुढे ठेवले. सँको डॉनजवळच त्याला वाढण्याकरिता उभा राहिला. डॉनने आपले कपासारखे भांडे काढले. त्यात सँकोने पुन्हा पुन्हा तो पदार्थ ओतला. त्याची चव घेता घेता डॉन सँकोला म्हणाला, "सँको, पाहिलंस ना? या लोकांच्या प्रवासात किती मजा असते ती? सरदारांचा आणि त्यांच्याबरोबर असणाऱ्या लोकांचा जागोजाग किती मान-सन्मान होतो, ते आता तुला हळूहळू दिसून येईल." सँको म्हणाला, "सरदारसाहेब, आपण माझा फारच मान राखीत आहात. पण एक गोष्ट आपण लक्षात ठेवा की, आपल्यासारख्या थोर सरदाराशेजारी उभे राहण्यात आणि आपल्या सान्निध्यात पावाचे शिळे तुकडे खाण्यात मला मेजवानीचा आनंद वाटतो."

डॉन म्हणाला, "ते सर्व ठीक आहे; पण आता तुला येथे माझ्याजवळ बसायला हरकत नाही. कारण जो स्वतः नम्रतेने बोलतो आणि वागतो; त्याचाच या जगात बहुमान होत असतो." हे सारे त्या दोघांचे बोलणे त्या धनगर लोकांना काही कळत नव्हते. पण सर्वांचे जेवण मात्र व्यवस्थित चालले होते. डॉन आणि सँको यांना कडकडीत भूक लागली असल्यामुळे त्यांना आजचे जेवण म्हणजे एक मोठी मेजवानीच झाली.

जेवण संपल्यावर सारेजण मध्यभागी पेटविलेल्या शेकोटीभोवती जमले. धनगरांबरोबरच डॉन आणि सँको यांनीही बरीच दारू घेतली. ते धनगरांची गाणी ऐकत बसले. डॉनचे अंग ठणकत होते

म्हणून एका धनगराने कोठल्यातरी झाडपाल्याचा एक लगदा तयार करून आणला. आणि तो डॉनच्या जखमांवर बांधला. त्यामुळे डॉनला जरा बरे वाटले. मग डॉन आणि सँको एका झाडाखाली पडून राहिले. दमल्यामुळे आणि पोट भरल्यामुळे रात्री तेथे त्यांना चांगलीच झोप लागली. त्या झोपेत मोठ-मोठ्या पराक्रमांची सुखस्वप्ने त्यांनी पाहिली. सँकोने बाजूला जमिनीवर पडून शांत झोप घेतली. डॉन आणि सँको यांची धनगर लोकांशी चांगली मैत्री जमली. कित्येक दिवस ते त्यांच्यांत राहिले. या अवधीत डॉनच्या सगळ्या जखमा बऱ्या झाल्या. काही दिवसांनी डॉन आणि सँको ही जोडी नवीन पराक्रम करण्यासाठी निघाली.

□ □ □

## रस्त्यातील एक चकमक

७

डॉन आणि सँको प्रवासाला पुढे निघाले. राक्षसाशी झालेल्या युद्धात आपला भाला मोडून गेला, याचे डॉनला राहून राहून वाईट वाटत होते. जुन्या काळचे सरदार लोक भाला मोडला की, ओक वृक्षाच्या फांदीचा भाल्याऐवजी लढाईत उपयोग करीत, असे पुस्तकात कोठेतरी वाचल्याचे त्याला आठवले. मग डॉन सँकोला म्हणाला, " हे पाहा, आता आपल्याला रस्त्यात प्रथम जो ओक वृक्ष लागेल, त्याची एक सरळ फांदी मोडून एक काठी बनवायची. भाल्याच्या

ऐवजी आता काठी हेच माझे शस्त्र ! त्या काठीनेच मी तुला पुष्कळसे पराक्रम गाजवून दाखवीन."

सँकोने एकदा आपल्या पराक्रमी सरदाराकडे पाहिले त्याच्या बढाया ऐकून तो म्हणाला, "सरदारसाहेब, ठीक आहे, पण आता तुम्ही तुमच्या घोड्यावर अधिक सरळ बसलात तर बरे होईल. तुम्ही एका बाजूला झुकलेले दिसता. कदाचित तुम्हांला बसलेल्या माराने तुमच्या जखमा दुखत असतील त्यामुळे असे होत असेल."

डॉन म्हणाला, "सँको, तू योग्य बोललास. मी माझ्या जखमांची कुरकूर करीत नाही किंवा वेदनांनी कण्हत नाही. कारण जुन्या काळचे पराक्रमी सरदार आपल्याला झालेल्या जखमा कितीही तीव्र असल्या तरी त्यांची पर्वा करीत नसत."

सँको म्हणाला, "हो, हो, हो ! बरोबर आहे. तर मग माझे काही म्हणणे नाही. सरदारांचे हे जर तत्त्वच असेल तर तुम्हांला या जखमांना मुळीच जुमानता कामा नये. पण तुम्ही सरदारांचा हा नियम आम्हां हुजऱ्यांना लागू नाही." सँकोच्या बोलण्याचे डॉनला हसू आले !

थोड्याच वेळात त्यांना एक ओक वृक्ष दिसला. डॉनने त्यावर जणू झडपच घातली आणि त्याची एक लांबलचक फांदी तोडून घेतली. त्या फांदीपासून त्याने नवीन भाला तयार केला. शस्त्र हाती येताच डॉन म्हणाला, "आता आपण पुढले पराक्रम गाजवायला तयार झालो आहोत. आणि हे पाहा सँको, तुला एक गोष्ट आधीच सांगून ठेवतो. मी एखाद्या सरदाराशी लढत असलो आणि माझ्यावर कितीही मोठे संकट आले असले, तरी तू आपली तलवार घेऊन माझ्या मदतीला येता कामा नये. कारण, सरदारांच्या कथां-मधून असा नियम आहे की, हुजऱ्यांना सरदारकी मिळाल्यावाचून

त्यांनी दोन सरदारांच्या द्वंद्व युद्धात भाग घ्यायचा नाही. ”

सँको खाली वाकून मुजरा करीत म्हणाला, “ महाराज, आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. ”

अशा प्रकारे त्यांचे बोलणे चालू असताना समोरून काही प्रवासी येताना त्यांना दिसले. त्यांपैकी दोघे जोगी असावेत असे दिसत होते. त्यांच्या मागे बग्गी येत होती. बग्गीबरोबर पाच घोडेस्वार आणि दोन खेचरवाले होते. बग्गीत एक स्त्री बसली होती. ती सेव्हिली या गावी असलेल्या आपल्या नवऱ्याकडे चालली होती. काळ्या पोषाखात जे दोन जोगी पुढे चालले होते, त्यांचा या मागच्या लोकांशी काही संबंध नव्हता.

या सर्व लोकांना पाहिल्याबरोबर सरदार डॉन यांना एकदम स्फूर्ती आली आणि ते म्हणाले, “ सँको, अगदी मोठा पराक्रम गाजविण्याची वेळ आली आहे. ते काळ्या झग्यांतले दोन लोक दिसत आहेत ना, ते जादूगार आहेत. आणि ते बग्गीत बसलेल्या राजकन्येला पळवून नेत आहेत. त्या राजकन्येची सुटका करणे हे माझे पहिले कर्तव्य आहे. ”

त्यावर सँको म्हणाला, “ हे तुमचे युद्ध तुम्हांला त्या पवन-चक्क्यांशी केलेल्या युद्धापेक्षा जास्त भोवणार आहे. जरा बारकाईने लक्ष देऊन पाहा. ते काळे झगे घातलेले लोक जोगी आहेत. त्या बग्गीशी त्यांचा काही संबंध दिसत नाही. आणि ते घोडेस्वार त्या स्त्रीला घेऊन कुठेतरी परगावी जात आहेत. ती राजकन्या वगैरे काही नाही. तेव्हा तुम्ही लढाई करण्याचा अविचार करू नका. ”

“ पुरे कर तुझी वटवट ! ” डॉन म्हणाला, “ ही साहसी कृत्ये आणि पराक्रम म्हणजे काय याची तुला अजून कल्पना नाही. ” असे म्हणून डॉनने आपला घोडा पुढे हाकारला आणि त्या प्रवाशां-

जवळ गेल्यावर तो ओरडून म्हणाला, " त्या राजकन्येला कोठे घेऊन चाललात ? सोडा तिला, नाही तर तुमच्या या दुष्कृत्याबद्दल तुम्हांला मरण पत्करावे लागेल. "

" अहो आम्ही दुष्ट, चोर, लुटारू नाही. आम्ही धर्मकार्ये करणारे जोगी आहोत. त्या बग्गीत कोण आहे ते आम्हांला ठाऊक-सुद्धा नाही. " ते दोघेजण म्हणाले.

डॉन म्हणाला, " अरे चोरांनो, तुमच्या असल्या भुलथापांनी मी फसणार नाही. " एवढे बोलून डॉनने लगेच एका जोग्यावर हल्ला केला. सुदैवाने तो जोगी खेचरावरून जमिनीवर पडल्याने ठार झाला नाही. दुसरा जोगी हा प्रकार पाहून भ्याला आणि आपल्या खेचराला पिटाळीत दूर निघून गेला. सँको ताबडतोब पुढे झाला आणि खेचरावरून खाली पडलेल्या जोग्याला लुटायला त्याने सुरुवात केली. त्या जोग्यामागून त्याचे नोकर चालत येत होते, ते पुढे झाले आणि सँकोला त्याच्या कृत्याचा जाब विचारू लागले. सँको म्हणाला, " या जोग्याला आमच्या धन्याने लढाईत जिंकले आहे. आता त्याच्या जवळ असलेले, सर्व काही आमचे झाले आहे. "

त्या नोकरांना हा काय प्रकार आहे हे समजेना. त्यांनी डॉनचे लक्ष नाही असे पाहून सँकोला बडवायला सुरुवात केली. सँकोला त्यांनी लाथांनी तुडविले. त्यांची दाढी धरून ओढली आणि जवळ जवळ बेशुद्ध अवस्थेत त्याला जमिनीवर पाडले. तेवढ्यात तो जोगी उठला, आपल्या खेचरावर बसला आणि आपल्या सोबत्याला गाठण्यास निघून गेला.

इकडे डॉन क्विक्झोट त्या बग्गीजवळ असलेल्या स्त्रीजवळ बोलण्यासाठी पुढे गेला व म्हणाला, " आता तुम्ही मोकळ्या झाल्या आहात. तुम्हांला कैद करणाऱ्या त्या लोकांना मी हाकून लावले

आहे. मी डॅान क्विक्झोट, ला मांचा येथील एक पराक्रमी सरदार, आणि डुलसीनिया टोंबोसो या सुंदर स्त्रीचा प्रियकर आहे. मी आपणाला एकच विनंती करतो. आपण टोंबोसाला जाऊन मी आपणासाठी काय केले, ते माझ्या प्रियेला सांगा."

त्या बग्गीबरोबर हुजरे होते त्यांपैकी एकजण पुढे आला आणि म्हणाला, "अहो सरदारजी, या बग्गीपासून एकदम चालते व्हा; नाहीतर तुम्हांला प्राणांना मुकावे लागेल." डॅान म्हणाला, "हे असलं बोलणं तुमच्या अंगाशी येईल. याबद्दल तुम्हांला शिक्षा होईल. पण—पण तुम्ही सरदार दिसत नाही."

हुजऱ्या म्हणाला, "काय म्हणतोस मी सरदार नाही. तर मग तुझा तो भाला टाकून दे आणि तलवार घे. पाहू या कोण जिकतो ते."

डॅानने आपला भाला टाकला, तलवार उपसली. आणि तो त्या हुजऱ्यावर चालून आला. हुजऱ्याने बग्गीतली एक उशी काढली आणि तिचा ढालीसारखा उपयोग केला. बग्गीमधील स्त्री घाबरून गेली आणि तिने बग्गीवाल्याला बग्गी पुढे घेण्यास सांगितले. हुजऱ्याने आपल्या तलवारीने डॅानच्या शिरस्त्राणाचा एक तुकडा उडवला आणि त्याच्या खांद्यावर वार केला.

हुजऱ्या खेचरावरून लढत होता. तलवारींच्या खणखणाटाने खेचर घाबरले आणि गोल गोल फिरू लागले. त्याबरोबर हुजऱ्या खाली जमिनीवर पडला. डॉननेही घोड्यावरून खाली उडी मारली आणि आपली तलवार त्या हुजऱ्याच्या डोळ्यांसमोर रोखून तो म्हणाला, "शरण आलो म्हणून कबूल कर. नाहीतर आता तुझे डोकेच उडवितो. हा प्रकार पाहून बग्गीमधील स्त्री धावतच तेथे आली आणि म्हणाली, "महाराज, कृपा करून या माझ्या हुजऱ्याला जीवदान द्या."

त्यावर डॉन म्हणाला, " बाईसाहेब, एकाच अटीवर या तुमच्या हुजऱ्याला मी जीवदान देतो. त्याने टोंबोसा येथे जावे. आणि डुल्सीनियासमोर जाऊन याबाबत तिचे काय म्हणणे आहे ते विचारावे." हे ऐकताच बग्गीमधील स्त्रीने तशा प्रकारचे अभिवचन डॉनला दिले. कारण ती फार घाबरून गेली होती. तेव्हा डॉननेही हुजऱ्याला जीवदान दिले.

आता लढाई संपली असे पाहून सँकोपांझा डॉनकडे आला, त्याच्यासमोर गुडघ्यावर उभा राहिला आणि डॉनला मुजरा करून म्हणाला, " धनीसाहेब, ही एक मोठीच लढाई तुम्ही जिंकली आहे. मग आता मला एका बेटाचे राज्य देऊन टाका. ते बेट कितीही मोठे असले तरी त्यावर राज्य करण्यास मी समर्थ आहे."

डॉन म्हणाला, " हात् वेड्या, अरे या लढाईत मी बेट कोठे जिंकले आहे? ही तर रस्त्यावर झालेली एक चकमक आहे. तू थोडा धीर धर. लवकरच आपण असे एखादे युद्ध जिंकू. मग त्यात मात्र तुला एखादे राज्य बक्षीस मिळेल."

सँकोने डॉनला घोड्यावर बसण्यास हात दिला. तो स्वतः आपल्या गाढवावर स्वार झाला आणि त्यांचा पुढला प्रवास सुरू झाला.

□ □ □

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २९८०
विषय बा० वा० दिनांक १८/८/८८

## ८ हा सारा त्या घोड्याचा प्रताप

डॉन आणि सँको यांचा प्रवास हळू हळू पुढे सुरू झाला. काही मैल अंतर चालून गेल्यावर ते एक मैदानात येऊन ठेपले. जवळपास हिरवळ असल्यामुळे त्यांनी आपल्या घोड्याला आणि गाढवाला चरायला सोडून दिले. सँकोने आपल्या जवळची पिशवी काढली. त्या धनगरांनी सँकोच्या पिशवीत काही खाण्याचे पदार्थ भरून दिले होते. सँकोने ते बाहेर काढले. झाडाखाली हिरवळीवर बसून त्यांनी बरोबरच्या अन्नावर ताव मारला. झऱ्याचे थंडगार पाणी ते भरपूर प्याले आणि त्यांनी समाधानाचा ढेकर दिला.

रोझीनांट कोठें हिंडत होता, हे सँकोनें पाहिलेच नाही. कारण तो जरी युद्धातील घोडा आहे असे डॉन समजत होता तरी पळून जाण्याइतका तो चपळ नव्हता, हे सँकोला माहीत होते. त्याच हिरवळीवर दुसरे काही घोडे चरत होते. स्पेनच्या उत्तर भागातील काही घोडेस्वार आपले घोडे त्या हिरळीवर चरायला सोडून जवळपास मुक्काम करत होते. हे घोडे दिसतातच डॉनचा रोझीनांट घोडा धावत धावत जाऊन त्या घोड्यांना मिळाला. इतर घोड्यांना हा पाहुणा घोडा आपल्यांत येऊन मिसळलेला आवडला नाही. ते संतापले, लाथा झाडू लागले, दात विचकू लागले आणि रोझीनांटला सतावून त्याच्या पाठीवरचे जीन त्यांनी खाली ओढले.

बाजूलाच बसलेले ते घोडेस्वार हा पाहुणा घोडा पाहून पुढे आले आणि रोझीनांटला त्यांनी इतका बदडला की, शेवटी तो पाय ताणून खाली जमिनीवर पडला. तेवढ्यात या प्रकाराकडे

डॉन क्विक्झोट आणि सँको यांचे लक्ष गेले. घाईने ते तिकडे धावत धावत गेले. डॉन म्हणाला, "सँको, या लोकांकडे पाहून हे कोणी सरदार असावेत असे वाटत नाही. हे कोणीतरी नीच वृत्तीचे लोक आहेत. आपल्या रोझीनांट घोड्याची यांनी काय अवस्था केली आहे पाहा ! याचे चांगलेच उट्टे काढले पाहिजे ! या कामी तू मला मनापासून मदत करशील ना ? "

" अरे बापरे हे कसे शक्य आहे सरदारसाहेब ? हे लोक तर विसापेक्षाही जास्त दिसतात. आणि आपण तर दोघेच. किंवा खरे म्हणजे दीडच आहोत. " सँको म्हणाला.

डॉन म्हणाला, " अगदीच भ्याड आहेस तू. अरे, मी एकटा म्हणजे शंभर समज तू ! "

यानंतर एक शब्दही न बोलता डॅान त्या लोकांवर चालून गेला सँकोही त्याच्या मागोमाग गेला.

त्या घोडेस्वारांपैकी एकाच्या खांद्यावर वार करून डॉनने त्याला जखमी केले; पण हे दोघेच आहेत असे जेव्हा त्यांनी पाहिले तेव्हा ते सारेजण आपल्या काठ्या घेऊन पुढे आले. त्यांनी या दोघांना घेरले, डॅानला चांगलेच फटके लगावले आणि त्याला खाली लोळविले. सँको तर एका फटक्यातच घायाळ होऊन आपल्या धन्याजवळ पडला. रोझीनांट घोडाही अजून जवळच कण्हत पडला होता. ते सारेजण मेले असावेत असे त्या घोडेस्वारांना वाटले मग घोडेस्वार भराभर आपल्या घोड्यांवर बसले आणि दौडत निघून गेले.

बराच वेळ याच स्थितीत निघून गेला. नंतर प्रथम सँको शुद्धीवर आला. अतिशय खोल आवाजात आणि कण्हत कण्हत तो म्हणाला, " सरदारसाहेब, अहो सरदारसाहेब, कसे होणार हो आपले ? "

थोड्या वेळाने सरदारसाहेबही शुद्धीवर आले. आपल्या हुजऱ्याकडे पाहून ते म्हणाले, "तुझे कसे आहे रे बाबा ?"

सँको म्हणाला, "आपण फारच जखमी झालो आहोत. आपले पाय बरे होऊन आपल्याला चालायला लागायला किती दिवस लागणार आहेत कोण जाणे ?" यावर डॉन म्हणाला, "सँको, माझीच चूक झाली. तो सर्वस्वी माझाच अपराध होता. ते मचाचे लोक सरदार नसताना मी त्यांच्याशी उगीच मारामारी केली. या बाबतीत मला तुझ्याजवळ पुष्कळच बोलायचं आहे पण मला होत असलेल्या वेदनांमुळे आत्ता जास्त बोलवत नाही. अरे, तुला मी



एखाद्या बेटाचा राजा कसं बरं करायचं ? राज्याचं संरक्षण करण्याची ताकद तुझ्यात नाही, आणि शत्रूचा प्रतिकारही तुला

करता येणार नाही, असे तुझ्या वागण्याबोलण्यावरून दिसते. म्हणजे एखादे राज्य तुझ्या स्वाधीन करणं हा अगदी वेडेपणाच होईल."

सँको म्हणाला, "महाराज, आता ही चर्चा करण्यापेक्षा आपल्या जखमांच्यावर काही इलाज आधी करणं हेच योग्य होय. खरं म्हणजे आपला हा रोझीनांट घोडाच आपल्यावर ओढवलेल्या संकटाला कारण आहे."

यानंतर डॉन कण्हत कण्हत कसाबसा आपल्या दोन पायांवर उभा राहिला. त्याने हळूहळू आपल्या रोझीनांट घोड्याला उठविले. डॉनला धड चालताही येत नव्हते. पण मोठ्या मेटाकुटीने तो चालू लागला. सँकोने आपल्या गाढवावरच जीन चढविले. डॉनला त्याच्यावर बसविले. रोझीनांटचा लगाम त्या गाढवाच्या शेपटीला बांधला. मग गाढवाला पकडून सँको आणि त्याच्यामागून ते सारे लटांबर रस्त्याने हळूहळू जाऊ लागले.

दोन-तीन मैलपर्यंत ते असेच रखडत चालले होते. तेवढ्यात सँकोला थोड्या अंतरावर एक खाणावळ दिसू लागली. ती खाणावळ आहे का किल्ला आहे, असा वाद करीत ते दोघेही त्या खाणावळीपर्यंत येऊन पोहोचले.

# गुंडांच्या तावडीतून सुटका

१ गाढवावर कसाबसा बसलेला सरदार, त्याला धरून चालणारा त्याचा हुजऱ्या, आणि त्या दोघांच्याही मागून रखडत येणारा घोडा ह्या सर्व प्रकाराची खाणावळवाल्यास गंमत वाटली. खाणावळवाल्याने सँकोजवळ 'हा काय प्रकार आहे ?' अशी चौकशी केली. तेव्हा सँको म्हणाला, "काही विशेष नाही. आमचे सरदारसाहेब एका खडकावरून घसरले आणि त्यांच्या बरगड्यांना बराच मुका मार बसला."

त्या खाणावळवाल्याची बायको स्वभावाने फार दयाळू होती. डॉन क्विक्झोटच्या जखमा तिने स्वतः धुतल्या आणि त्यांना मलमपट्टी केली. या कामात तिने आपल्या मुलीला मदतीला घेतले. त्या दोघींनी मिळून सरदारसाहेबांसाठी एक मऊ मऊ बिछाना बनविला. डॉनला झालेल्या जखमा या पडल्याच्या जखमा नसून फटक्यांच्या जखमा असाव्यात, अशी शंका मलमपट्टी करणाऱ्या बाईंच्या डोक्यात आली आणि त्यांनी ती सँकोजवळ बोलूनही दाखविली. त्यावर सँको म्हणाला, "सरदारसाहेब, खडकाळ भागात पडल्यामुळे त्या जखमा तशा दिसत आहेत."

खाणावळवाली बाई सँकोला म्हणाली, "तुम्ही का विव्हळता ? का तुम्हीही कोठून तरी पडलात ?"

सँको म्हणाला, "नाही, तसं नाही. आमचे धनीसाहेब खडकावर पडून त्यांना एवढं लागलं आहे हे पाहून मला फार वाईट

वाटलं आणि त्यांना किती त्रास होत असेल या विचारानेच माझे सर्व अंग ठणकू लागले."

त्याची थट्टा करण्याच्या उद्देशाने त्या बाईची मुलगी म्हणाली, "असेल बाई कदाचित ! मलाही एकदा स्वप्न पडले होते, त्यात मी एका उंच मनोऱ्यावरून खाली कोसळले आणि मला खूप लागले इतक्यात मी जागी झाले आणि पाहते तर काय, खरो-खरीच माझं सारं अंग खूपच दुखू लागले." अखेर डॉन आणि सॅंको त्या बिछान्यावर व्यवस्थित झोपले.

अजूनही डॉनला आपण एका किल्ल्यातच आहोत असे वाटत होते, आणि आपली सेवा करणारी किल्ल्यातील मालकीण व तिच्या-बरोबर असलेली तिची मुलगी अशी त्याची समजूत होती. तसे तो बडबडला. डॉनच्या त्या बोलण्यातील एक शब्दही त्यांना कळत नव्हता. पण आपण करीत असलेल्या सेवेबद्दल आभार मानण्याचा हा एक प्रकार असावा, अशी त्यांनी समजूत करून घेतली.

औषध घेतल्याने दुसऱ्या दिवशी डॉन क्विक्झोटला बरे वाटू लागले व तो आता पुढल्या प्रवासाला निघण्याची तयारी करू लागला. आपल्या मदतीसाठी सर्व जग खोळंबून राहिले आहे, त्यामुळे आता आपण मुळीसुद्धा विलंब लावता कामा नये, असे त्याला वाटत होते.

दोन-तीन दिवसांनी एका पहाटेच्या वेळी डॉन आणि सँको दोघेही तेथून निघाले. तेथून बाहेर पडताना डॉनने त्या खाणावळ-वाल्यास मोठ्या गंभीर आवाजात ललकारी दिली, "किल्लेदार-साहेब, अहो किल्लेदारसाहेब, आपण केलेल्या बहुमोल उपकारां-बद्दल मी आपला फार आभारी आहे. आपले जर कोणी शत्रू असतील तर आपण मला नुसती आज्ञा करा की मी लगेच त्यांचा

निकाल लावीन. कारण मी एक मोठा सरदार आहे."

त्यावर तो खाणावळवाला तितक्याच गंभीर आवाजात म्हणाला, "आपणाकडून मला कोणत्याही मदतीची अपेक्षा नाही. शत्रूचा समाचार कसा घ्यावयाचा हे मला चांगलं ठाऊक आहे. तुम्ही, तुमचा हुजऱ्या, तुमचा घोडा व तुमचे गाढव येथे राहिलांत, तेव्हा तुम्ही सर्वांचे राहण्याचे आणि खाण्यापिण्याचे पैसे रोख द्यावे एवढीच माझी अपेक्षा आहे."

हे ऐकल्यावर डॉन क्विक्झोट रागाने म्हणाला, "तुम्ही पैसे मागता ? म्हणजे ही खाणावळ आहे की काय ?"

खाणावळवाला म्हणाला, "मग काय ? उत्तम खाणावळींपैकी ही एक आहे."

डॉन म्हणाला, "असं आहे तर ! मी तर हा एक किल्लाच आहे असे समजत होतो. आपण मला क्षमा करा. माझी समजूत चुकीची झाली. तरीपण माझ्यापासून बिलाची अपेक्षा करू नका. कारण मी सरदारकीचा नियम मोडणार नाही. सरदार लोक आपल्या जेवणाखाण्याबद्दल आणि कोठे वस्तीस राहण्याबद्दल पैसे देतात, हे मी कोणत्याच पुस्तकात कधीही वाचलेले नाही !"

"हे तुमचं बोलणं अगदी निरर्थक आहे. सरदारांची वर्णने मी वाचलेली नाहीत. ती वाचायला मला वेळही नाही. तुमचं जे बिल झालं आहे ते तुम्हांला भरलंच पाहिजे." खाणावळवाला म्हणाला.

त्यावर डॉन बोलू लागला, "बिनडोक आहांत तुम्ही ! ही तुमची असली खाणावळ पाहून मला दया येते." असे बोलून डॉनने लगेच घोड्याला टाच देऊन व आपला भाला ऐटीत वर धरून पोबारा केला. आपल्याला एक दमडीही न देता हे सरदारसाहेब घोड्याला टाच मारून निघून गेलेले पाहताच खाणावळवाल्याने

आपला मोर्चा सँको पांझाकडे वळविला. पण " धनीसाहेबांनी काही दिले नाही तर आपणही काही देणार नाही " असे सँकोने चक्क सांगितले. एका पराक्रमी सरदाराचा हुजऱ्या असल्याने त्या सरदाराला जो नियम लागू तोच त्याच्या हुजऱ्याला लागू असणार असे सँकोने उघड सांगितले.



त्या खाणावळीशेजारीच काही छोटया छोटया वस्तू बनविणाऱ्यांची वस्ती होती. खाणावळीत एखादी अडाणी व्यक्ती आल्यास किंवा काही बाचाबाची झाल्यास जवळपासचे सर्व लोक गोळा होत आणि अशा व्यक्तीची टवाळी करीत. अशी ही नऊ माणसे तेथे

हळूहळू जमा झाली. त्यांपैकी एकाने एक मोठे थोरले जाजम आणले आणि अंथरले. त्यांनी सँकोला गाढवावरून उतरविले आणि त्याचे बखोटे धरून त्याला जाजमाच्या मधोमध आणून बसविले. जाजमाची टोके सगळीकडून त्या लोकांनी धरली व जाजम उचलले; आणि त्यांनी हवेत चेंडूसारखे सँकोला उडविण्यास सुरुवात केली.

सँकोला प्रत्येक वेळी इतके हबके बसले आणि तो इतका भेदरून गेला की मोठमोठ्याने ओरडून ओरडून त्याने आकान्त केला. हा सँकोचा आरडाओरडा थोड्याच अंतरावर गेलेल्या डॉनच्या कानांवर गेला. पण हा सँको नसून दुसरेच कोणी संकटात सापडले आहे, आता आपल्या पराक्रमाला एक नवीन सावज मिळणार असे समजून तो मागे परतला. त्याबरोबर हा आवाज सँकोचाच आहे आणि त्या खाणावळीकडूनच येत आहे हे त्याच्या लक्षात आले.

डॉनने आपला घोडा खाणावळीजवळ आणला पण कंपाऊंडचा दरवाजा बंद होता. दुसऱ्या कोठूनही त्याला आत प्रवेश करता येण्यासारखा नव्हता. कंपाऊंडची उंची फारशी नसल्याने लोकरच त्याला आत चाललेला धिगाणा दिसला. त्याने तेथूनच ओरडून ओरडून मोठ्याने शिव्या द्यावयाला सुरुवात केली. परंतु आत चाललेला सँकोचा छळवाद अशा शिव्यांनी कमी होण्याऐवजी वाढतच होता. लोकांच्या तोंडचे हास्याचे फवारे जोरजोरात बाहेर पडत होते. सँकोचेही ओरडणे आणि विव्हळणे चालूच होते, पण त्या कशाचाच काहीही उपयोग झाला नाही. शेवटी ह्या खेळाचा त्या सर्व लोकांना कंटाळा आला. ते दमून गेले आणि अखेर थांबले. त्यांनी सँकोचे गाढव तेथे आणले आणि सँकोला त्या गाढवावर बसविले.

जवळच असलेल्या एका दयाळू मुलीने मोठ्या मनाने सँकोला

एक पेलाभर मद्य आणून दिले. सँकोनें तो पेला घटाघटा पिऊन टाकला आणि आपले गाढव हाकारले. आता दरवाजा उघडलेला असल्यामुळे तो तावडतोब बाहेर पडला. आपणही खाणावळवाल्याला शेवटी काहीच दिले नाही, या विचाराने सँकोची स्वारी खूष होती. पण त्या खाणावळवाल्याने त्याची पिशवीच काढून ठेवली होती, हे सँकोच्या लक्षातच आलें नाही. गुंडांच्या तडाख्यातून सुटका झाल्याने तो आपला गाढवाला हाकारीत वेगानें दौडत होता झाले !

## संकटे म्हणजे शुभशकुन

१० लौकरच सँकोने आपल्या धन्याला गाठले. पण त्या वेळी तो इतका दमला होता, की आपल्या गाढवावर बसून यापुढे चार पावलेही जाण्याची त्याच्यात ताकद उरली नाही. त्याची ती अवस्था पाहून डॉनला त्याची दया आली. तो म्हणाला, " अरेरे ! काय ही तुझी दशा ! मला तर असं वाटतं, की आपण ज्या किल्ल्यात राहिलो तो किल्ला एखाद्या जादूगारानें भारला असला पाहिजे. मी त्या किल्ल्याच्या भिंतीजवळ आलो होतो. दरवाजा बंद असल्यामुळे घोड्यावर बसून भिंतीलाच टेकून उभा होतो. त्या भिंतीवर चढून आत येण्याचाही माझा विचार होता. पण कसले काय ? मला त्या घोड्यावरून मुळी हालचालच करता येईना. जणू काही घोड्याच्या पाठीवर खोगिराला मी चिकटूनच बसलो होतो.

भुताटकीचा नाहीतर कसला प्रकार म्हणायचा हा ! मला जर तेथून आत येता आले असते तर त्या लांडग्याचे मी असे उट्टे काढले असते, की त्यांना जन्मभर माझी आठवण राहिली असती !"

सँको म्हणाला, " मलाही तसे करणे शक्य होते. पण मी अशा जागी सापडलो, की तेथून मला काहीच हालचाल करता येईना. जे लोक काल माझा खेळ करून आपली करमणूक करून घेत होते ते तुमच्या-माझ्यासारखेच हाडामांसाचे लोक होते. ती कोणी भुते होती किंवा ते कोणी जादूगार होते असे मला मुळीच वाटत नाही. आपण हा जो साहसांचा शोध लावण्याचा सपाटा चालविला आहे त्यामुळे आपली जास्त जास्तच दुर्दशा होत चालली आहे. आता यातून योग्य मार्ग म्हणजे आपण आपल्या गावी परतणे हा आहे, असे मला वाटते ! "

त्यावर डॉन म्हणाला, " किती मूर्ख माणूस आहेस तू ! जरा धीराने घे. एक दिवस असा उजाडेल, की माझ्यासारखा पराक्रमी सरदार होणे ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे हे तू आपल्या डोळ्यांनी पाहशील आणि तोंडाने कबूल करशील ! "

" असेल बुवा कदाचित ! पण मला काही तसं वाटत नाही. आत्तापर्यंत आपल्याला अनुभव काय आला ? एकही युद्ध आपण जिंकले नाही. आपला आत्तापर्यंतचा नमूद करण्यासारखा अनुभव म्हणजे सोट्यांचे तडाखे आणि ब्लँकेटमधून चेंडूसारखे हवेत उडण्याचे मला मिळालेले शिक्षण ! एवढेच ना ? " सँकोने विचारले.

अशा प्रकारच्या गप्पा करीत डॉन आणि सँको यांची जोडी हळूहळू पुढे जात होती. तेवढ्यात पुढच्या बाजूला थोड्या अंतरावर धुळीचे लोटच्या लोट वर जात असलेले दिसले. ते लोट

हळूहळू पुढे येत होते. त्यांच्याकडे बोट दाखवून डॉन म्हणाला, " सँको, ते पाहा धुळीचे केवढाले ढग उठले आहेत. आणि ते आपल्याकडेच येत आहेत. माझ्या मनगटात आणि माझ्या तलवारीत काय पराक्रम आहे तो तुला समक्ष पाहून घेण्याचा क्षण आता जवळ आला आहे. यापुढे पराक्रमाची जी पुस्तके लिहिली जातील त्यांत माझा हा पराक्रम निश्चित नोंदला जाईल. "

तेवढ्यात सँकोने मागे पाहिले आणि तो म्हणाला, " तुम्ही म्हणता ते जर खरं असेल तर आपल्यावर चालून येणारी दोन सैन्ये असली पाहिजेत. तुम्ही जरा मागे वळून पाहा. मागच्या बाजूनेही धुळीचे असेच लोट येत आहेत. "

डॉनने मागे वळून पाहिल्यावर त्याला मागून येणारेही धुळीचे लोट दिसू लागले. आता समोरासमोरून येणाऱ्या दोन सैन्यांचे या मैदानावर प्रचंड युद्ध होणार असे डॉनला वाटले. परंतु धुळीच्या लोटांवरून या जोडीने काढलेले अनुमान चुकीचे होते. कारण ते धुळीचे लोट विरुद्ध बाजूंनी येणाऱ्या मेंढ्यांच्या मोठमोठ्या कळपांमुळे निर्माण झालेले होते. अर्थात या धुळीच्या लोटांमुळे पलीकडे असलेली मेंढरे मात्र अजून त्यांना दिसली नव्हती.

डॉनचे बोलणे सँकोला खरे वाटले. तो घाबरून गेला आणि म्हणाला, " सरदारसाहेब, आता काय करायचं आपण ? " डॉन म्हणाला, " काय करायचं म्हणून काय विचारतोस ? जी बाजू आपणाला कमजोर दिसेल ती बाजू आपण पकडायची. अशा आणीबाणीच्या वेळी तू काय करायचं ते मी समजावून सांगतो. नीट लक्षात घे. आपल्याला ही दोन्ही सैन्ये चांगली दिसावी म्हणून ती पलीकडे एक छोटीशी टेकडी दिसते ना, त्या टेकडीवर आपण जाऊ. तेथून या युद्धाची आपणाला नीटशी कल्पना येईल. "

तेव्हा डॉन आणि सँको हे दोघेही जवळच्याच टेकडीवर गेले. तेथून तर त्यांना ह्या मेंढ्या आहेत हे चक्क कळले असते; पण अजूनही धुळीचे लोट मेंढ्यांना झाकीत होते. डॉनने तर कल्पनेनेंच सँकोला सारे काही सांगितले. येणाऱ्या सैन्यातील सैनिकांच्या शस्त्रांचे रंग, ढालींवरील अक्षरे आणि ती सैन्ये कोणत्या देशातून अगर कोणत्या प्रांतातून येत असतील हे त्यांच्या निशाणावरून डॉनला सारे काही दिसले. सँको पुन्हा पुन्हा डोळे मोठे करून पाहू लागला; पण त्याला काहीही दिसेना. तेव्हा तो म्हणाला, " सरदार-साहेब, आपण वर्णन करता तसले सैनिक, सरदार, पराक्रमी वीर यांपैकी मला काहीच दिसत नाही. कदाचित ही पूर्वीसारखीच भुताटकी तर नसेल ? "

डॉन म्हणाला, " अरे, असं काय करतोस ? त्या घोड्यांचे खिकाळणे, रणशिंगांचे आवाज, सैनिकांची आरडाओरड यांपैकी तुला काहीच कसे ऐकू येत नाही ? "

सँको म्हणाला, " नाही ! यांपैकी मला काहीसुद्धा ऐकायला येत नाही. मला फक्त मेंढरांचे आणि कोकरांचे बें बें ओरडणे तेवढे ऐकायला येत आहे. ही काय रणवाद्ये म्हणायची की काय ? "

डॉन क्विक्झोटच्या अंगात एकदम युद्धाचे वारे शिरले. तो पुढे सरसावला आणि भाला उगारीत टेकडी उतरला. सँकोचा अगदी नाइलाज झाला. तो मोठमोठ्याने ओरडत होता, " सरदारसाहेब, अहो सरदारसाहेब, मागे फिरा. अहो, ते सैन्य नसून ती मेंढरे आणि कोकरे आहेत ! "

डॉन टेकडीवरून वेगाने निघाला. लढाईच्या विचाराने त्याचे डोके भडकून गेले होते. रस्त्यावरून वेगाने चालताना तो ओरडत होता, " पराक्रमी आणि शूर सरदारांनो, घाबरू नका.

शत्रूने केलेल्या तुमच्या अपमानाची भरपाई करण्यासाठी मी पुढे होतो." अशी गर्जना करीत डॉनची स्वारी मेंढ्यांच्या एका कळपात घुसली. आणि आपल्या भाल्यानें त्या मेंढ्या-कोकरांवर वार करण्यास त्याने सुरुवात केली. जणू काही तो आपल्या शत्रूच्या सैन्यावर निकराने हल्लाच करीत होता.

"अहो बाबा, हे काय चालवलंय तुम्ही? आमच्या मेंढ्या काय मारता? थांबा!" असे ते धनगर ओरडले. पण डॉन कसला ऐकतो? त्याला तर लढण्याचा आवेश चढला होता. ते पाहून त्या धनगरांनी आपल्या गोफणी काढल्या आणि सरदार-साहेबांच्या तोंडावर सटासट दगड मारायला त्यांनी सुरुवात केली. तेव्हा डॉन मोठ्याने ओरडला, "अरे भ्याडांनो, कुठे आहे तो तुमचा पुढारी? त्याने माझ्यासमोर येऊन सामना द्यावा!" इतके डॉन बोलत आहे तोच एक दगड भिग् भिग् आवाज करीत सरदारसाहेबांच्या कानशिलांवर इतका जोरात बसला, की आता आपल्याला घेरी येऊन आपण पडणार असे त्याला वाटले. तोच दुसरा दगड आला तो त्याच्या दातांवर इतक्या जोरात बसला, की त्याचे तीन दात पडले आणि हातांची दोन बोटेही जखमी झाली. आता तर गोफणीतील दगडांचा मारा इतका सुरू झाला की, डॉन घोड्यावरून कोसळला आणि बिचारा मेल्यासारखा तेथे पडून राहिला. हा प्रकार पाहिल्यावर सारे धनगर त्याच्या जवळ जमले आणि आपण मारलेल्या दगडांनी हे सरदारसाहेब ठार झाले, असे त्यांना वाटले. आता यापुढे आपल्या गळ्यात काही भानगड येऊ नये असा विचार करून त्या धनगरांनी आपली मेंढरे गोळा केली आणि वेगाने आपला पुढला रस्ता धरला. डॉनने युद्धाच्या आवेशात त्यांची सात-आठ मेंढरे मारली होती तीही त्यांनी बरोबर घेतली.

हे युद्ध चालू असताना सँको टेकडीवरच होता. तो आपल्या धन्याचा पराक्रम तेथून पाहत होता आणि आपल्या दुर्दैवाला दोष देत होता. थोड्या वेळाने तो टेकडीवरून खाली आपल्या धन्या-जवळ आला. डॉन मोठ्या कठीण अवस्थेत तेथे विव्हळत पडला होता. मात्र तो शुद्धीवर होता. सँको त्याला म्हणाला, " मालक, मी तुम्हांला मागे फिरायला सांगितले नव्हते का ? कारण, तुम्हांला वाटले तसे सैन्य नसून तो मेंढरांचा कळप होता ! "

डॉन म्हणाला, " अरेरे ! सँको, पाहिलंस ना, हा काय प्रकार झाला ? माझा शत्रू तो जादूगार येथे आला. त्याने जादूची कांडी फिरविली आणि सर्व काही बदलून टाकले ! तू मात्र स्वतःची फसवणूक करून घेतली आहेस. मी म्हणतो त्यावर तुझा विश्वास नसेल तर अजून जरा पुढे जाऊन पाहून ये. त्या मेंढरांची पुन्हा माणसे बनली असतील आणि ते सैन्य तुला दिसेल ! "

धन्याची ही दुर्दशा पाहिल्यावर त्याला काहीतरी खायला द्यावे म्हणून सँको पिशवी पाहू लागला. पण आपली पिशवीच खाणा-वळीत राहिल्याची त्याला आठवण झाली. त्या सगळ्या प्रकाराने आपण धन्याला सोडून पळ काढावा आणि आपला पगार किंवा एक बेट मिळण्याची आशा या सगळ्यावर पाणी सोडावे असे त्याला वाटले.

डॉन कसावसा कण्हत उठला. त्याने आपला एक हात तोंडावर धरला होता. आपले उरलेसुरले दातही गळून पडतील अशी त्याला भीती वाटत होती. तो हळूहळू सँकोजवळ आला आणि म्हणाला, " हे पाहा सँको, आपल्याला इतके सहजासहजी निराश होऊन चालायचं नाही. जी जी संकटे आपल्यावर येत आहेत ती सारी पुढे येणाऱ्या उज्ज्वल भविष्याचे शुभशकुन आहेत. "

सँको एकदम ओरडून म्हण  र, "अहो, पण आपली सर्व मालमत्ता ठेवलेली पिशवी त्या खाणावळवाल्याने लांबविली, तो कसला प्रकार ?"

डॉन म्हणाला, "काय म्हणतोस ? खाण्याच्या पदार्थांची आणि पैशांची पिशवी गेली ? मग आपण खाणार काय आता ?"

सँको म्हणाला, "मग आता असाच उपाशीपोटी पुढला प्रवास करायचा !"

डॉन म्हणाला, "काही चिंता नाही. तू माझ्या मागोमाग ये."

सँको म्हणाला, "आपण येथून प्रथम दुसरीकडे कोठेतरी खात्रीच्या वस्तीला जाऊ. पण प्रथम तेथे कोणी आपला छळ करील असे गुंड लोकांचे टोळके नाही ना याची मला खात्री करून घेतली पाहिजे."

सँकोने डॉनला घोड्यावर बसविले, तो स्वत: गाढवावर बसला आणि हळूहळू दोघेही पुढचा मार्ग आक्रमू लागले.

▭ ▭ ▭

# जादूचा टोप मिळाला

११

काही अंतर दौडत गेल्यावर डॉनला एक घोडेस्वार दिसला. त्याने डोक्यावर घातलेले काहीतरी सोन्याच्या मुकुटाप्रमाणे चकाकत होते. तो मुकुटच आहे असे समजून डॉन सँकोला म्हणाला, "सँको, आपल्याला जे विशेष अनुभव येतात, त्या अनुभवांतूनच आपल्या भाषेतील

म्हणी बनतात. 'आपल्याला एक दरवाजा मिटलेला आढळला, तर त्याच वेळी दुसरा दरवाजा उघडलेला सापडतो.' अशी एक म्हण आपल्या भाषेत आहे. आता हेच पाहा. हा एक कोणीतरी सरदार आपल्या समोरून येत आहे. त्याच्या डोक्यावरचा तो जादूचा टोप पाहा. हा टोप घातल्यावर आपल्या इच्छेप्रमाणे अदृश्य होता येते, अशी यातील जादू आहे."

पण सँको म्हणाला, "मला कोणीतरी माणूस गाढवावरून येत आहे असे वाटते. पण त्याने डोक्यावर ठेवलेला तो मुकुट नाही. तुम्ही काहीतरी अचाट समजूत करून घेत असता नेहमी!"

"तू काही म्हणालास तरी तो मँब्रिनोचा मुकुटच आहे अशी मला खात्री आहे. तू भित्र्या भागूबाईसारखे करू नकोस. बाजूला हो. आत्ताच्या आत्ता मी काय पराक्रम करून दाखवितो तो तुला दिसेल. इतके दिवस ह्या शिरस्त्राणासाठीच माझी धडपड चालली होती." डॉन म्हणाला.

सँको म्हणाला, "मी तुमच्या आड मुळीच येत नाही. पण हा नेहमीप्रमाणेच तुमचा आणखी एक मूर्खपणा ठरू नये म्हणजे झाले."

डॉन क्विक्झोटला हा जो सरदार वाटला तो सरदार नसून एक न्हावी होता. तो आपल्या गाढवावर बसून दुसऱ्या लहान खेडे-गावाकडे आपल्या उद्योगधंद्याकरिता चालला होता. तोच डॉन क्विक्झोटला दिसला. न्हाव्याच्या हातात केस कापायच्या वेळी कढत पाणी घेण्याकरिता एक कटोरे होते. त्या वेळी पाऊस येण्याचा संभव असल्यामुळे ते कटोरे न्हाव्याने डोक्यावर पालथे ठेवले होते. कटोरे तांब्याचे असून ते घासून पुसून लख्ख केल्यामुळे थोड्या अंतरावरून उन्हात चांगलेच चकाकत होते. न्हाव्याने डोक्यावर

पालथे ठेवलेले तांब्याचे कटोरे म्हणजे पूर्वीच्या सरदारांच्या कथांतून वर्णन केलेले शिरस्त्राणच आहे असे डॉनला वाटले.

न्हावी जसजसा जवळ येऊ लागला तसतसा डॉनने आपल्या घोड्याला चौखूर सोडला. अर्थातच हा वेग न्हाव्याच्या गाढवाच्या वेगापेक्षा थोडासुद्धा जास्त नव्हता. डॉनने आपला भाला काढून न्हाव्यावर नेम धरला आणि तो ओरडून म्हणाला, " नीचा, प्रथम शरण आलो म्हणून कबूल कर, नाहीतर मरणाला तयार हो. "

एखाद्या वन्य पशूप्रमाणे हा माणूस आपल्यावर भाला उगारून आलेला पाहताच न्हाव्याने गाढवावरून खाली उडी मारली आणि शक्य तितक्या वेगाने तो पळून गेला. मात्र त्या गडबडीत त्याच्या डोक्यावरचे ते तांब्याचे कटोरे खाली पडले न्हावी पळून गेलेला पाहून डॉनला बरे वाटले. त्याने सँकोला ते जमिनीवर पडलेले शिरस्त्राण उचलायला सांगितले. सँकोने ते उचलले आणि तो म्हणाला, " वारे, वा ! काय पण शिरस्त्राण ! हे तर पाणी ठेवण्याचे कटोरे आहे. "

डॉनने ते हातात घेतले आणि तो ते फिरवून पाहू लागला. मग तो म्हणाला, " अरे, या शिरस्त्राणाचा अर्धा भाग गेलेला दिसतो. बरं ! जाऊ द्या ! हे आपण असेच डोक्यावर घालू या ! " असे म्हणून त्याने ते कटोरे आपल्या डोक्याला घातले. डॉनचा हा वेडेपणा पाहून सँकोची हसून हसून पोट दुखण्याची पाळी आली. पण डॉनने दिलेल्या धमकीची आठवण होऊन त्याने आपले हसणे आवरले.

डॉन म्हणाला, " सँको, मला काय वाटते ते सांगू ? हे जादूचे शिरस्त्राण चुकून कोणा एखाद्याच्या हाती लागले असेल. शिरस्त्राण म्हणून याचा कसा उपयोग करायचा हे त्याला माहिती असेल. ते

वाचनालय
क्र. 2900

अस्सल सोन्याचे आहे हे लक्षात आल्यावर त्याचे पैसे मिळविण्या-साठी त्यातील अर्धे त्याने आटवले असेल आणि राहिलेला अर्धा भाग, तू आता म्हणतोस त्याप्रमाणे न्हाव्याच्या कटोऱ्यासारखा दिसतो आहे. पण हे रूपान्तर मला कळून चुकले आहे. आपण आता ज्या खेड्यात जाऊ तेथल्या एखाद्या सोनाराला आपण गाठू आणि त्याच्याकडून हे शिरस्त्राण दुरुस्त करून घेऊ. "

सँको म्हणाला, "ठीक आहे. पण हा मारा गोफणीतील दगडांचा नसला तरच हे शिरस्त्राण उपयोगी पडेल. पण या गाढवाचे काय करायचे ? आपण ते जिंकून मिळविले आहे आणि त्याचा मालक काही आता परत नेण्यासाठी येणार नाही."

डॉन म्हणाला, "पण असे पाहा सँको, आम्हां सरदारांची अशी रीत नाही. या ज्या शत्रूंना आम्ही जिकले, त्यांचे घोडे आपल्या ताब्यात घेऊन त्यांना पायी चालविले असे कोणाही सरदाराने केल्याचे माझ्या वाचनात नाही. म्हणून याला येथे सोडून दे. त्याचा मालक आपल्या भीतीने सध्या पुढे येत नाही. आपण येथून पुढे गेल्यावर तो येऊन याला घेऊन जाईल."

सँको म्हणाला, "तुमचे हे सरदारकीचे नियम मोठे कडक दिसतात. पण कृपा करून मला एका गोष्टीची परवानगी द्या. या गाढवावरचे हे खोगीर चांगले दिसते आहे. त्याची तेवढी मी अदलाबदल करतो."

डॉन डोके खाजवून काही आठवू लागला. शेवटी तो म्हणाला, "तसे काही माझ्या वाचनात नाही. पण खरोखरीच तुला या नवीन खोगिराची आवश्यकता असेल तर ते बदलून घ्यायला हरकत नाही."

या पडत्या फळाची आज्ञा घेऊन सँकोने आपल्या गाढवावरील

खोगीर काढले आणि त्या न्हाव्याच्या गाढवावरील खोगीर आपल्या गाढवावर चढविले. त्यामुळे सँकोचे गाढव पूर्वीपेक्षा भलतेच चांगले दिसू लागले. आता पुढे कोठे जायचे हे न ठरविताच ते दोघेही आपापल्या आवडत्या प्राण्यावर बसून चालू लागले.

□□□

## आणखी एक पराक्रम

१२ डॉन क्विक्झोट आणि सँको यांचा प्रवास पुढे चालू होता. वाटेत एके दिवशी त्यांना बरेचसे कैदी दिसले. त्या कैद्यांबरोबर हत्यारी पोलीस होते. कैद्यांना घेऊन ते किनाऱ्याकडे चालले होते. या कैद्यांना गुलाम म्हणून बोटीवर काम करायचे होते. डॉनने आपला रोझीनांट घोडा पुढे हाकारला आणि त्या हत्यारी पोलिसांना थांबविले. त्या कैद्यांना त्याने निरनिराळे प्रश्न विचारले. त्यांनी दिलेल्या उत्तरावरून त्या कैद्यांना सोडविणें हे आपले कर्तव्य आहे, असे डॉनला वाटले. लगेच त्याने त्या हत्यारबंद पोलिसांना हुकूम सोडला, "आत्ताच्या आत्ता या कैद्यांना सोडून द्या, नाहीतर युद्धाला तयार व्हा."

शिपायांनी ती गोष्ट नाकारली, तेव्हा डॉनने त्यांच्यावर हल्ला केला. हा प्रकार डॉनला चांगलाच भोवला असता. पण या संधीचा फायदा घेऊन कैद्यांनी आपले साखळदंड तोडले आणि त्या कैद्यांनीच पोलिसांची दाणादाण उडविली.

सगळे कैदी डॉनच्या भोवताली गोळा झाले आणि म्हणाले, "महाराज, आज आपले आमच्यावर फार उपकार झाले. आता आम्ही आपल्याला कोणती मदत करू बरे ?"

४

डॉन म्हणाला, "तुम्ही सारेजण आत्ताच्या आत्ता माझी प्रिया डुलसीनिया हिच्याकडे जा आणि तिच्यापुढे गुडघे टेकून माझ्या पराक्रमाचे वर्णन करा."

ते कैदी ही गोष्ट करण्यास तयार नव्हते. डॉनने या बाबतीत फारच आग्रह धरला तेव्हा, 'ही गोष्ट आम्ही कधीही करणार नाही' असे त्या कैद्यांच्या पुढाऱ्याने निक्षून सांगितले. झाले! कैदी आणि डॉन यांच्यांत भांडण सुरू झाले. कैद्यांनी डॉनवर दगडांचा वर्षाव केला. तो डॉनला इतका असह्य झाला, की डॉन शेवटी जमिनीवर पडला. कैद्यांच्या पुढाऱ्यांनी डॉनचे ते जादूचे शिरस्त्राण काढून घेतले. त्यांच्याजवळचे काही कपडेही कैद्यांनी काढून घेतले आणि ते सारेजण पळून गेले.

त्या कैद्यांना डॉनने मुक्त केले, ही गोष्ट बेकायदेशीर आहे हे सँकोने ओळखले होते. तेव्हा आपणही आता काही काळ टेकडी-कडे जाऊन गुप्तपणे राहावे असे त्याने डॉनला सांगितले. मग ते दोघेही एका उंच, खडकाळ आणि निर्मनुष्य भागात गेले. या भागाला सेबल् टेकड्या म्हणत असत. ती रात्र त्यांनी त्या टेकड्यांच्या भागातच घालविली. पण त्या रात्री सँकोचे डॅपल् गाढव त्या कैद्यांच्या पुढाऱ्यांनी पळवून नेले. आपले गाढव गेल्याबद्दल सँकोला वाईट वाटले. पण 'आपण आपल्या गावी गेल्यावर एका ऐवजी तीन गाढवे देऊ.' असे डॉनने त्याला आश्वासन दिल्यावर सँकोचे दुःख कमी झाले.

डॉन क्विक्झोटने सँकोला टोंबोसे येथे जाऊन आपल्या पराक्रमाचे वर्णन डुलसीनिया या आपल्या प्रियेसमोर करण्यास सांगितले. डॉनच्या म्हणण्याप्रमाणे सँको रोझीनांट घोड्यावर बसून निघाला. आता डॉन सेबल टेकडीच्या भागात एकटाच राहिला.

सकाळी सँको एका खाणावळीकडे आला. तेथे त्याला त्यांच्या गावचा पाटील आणि न्हावी हे दोघे भेटले. सँकोच्या बरोबर डॉन नाही हे पाहून ते डॉनची हकीकत विचारू लागले. तेव्हा सँकोने घर सोडल्यापासून आत्तापर्यंतची सर्व हकीकत त्यांना सांगितली.

डॉन क्विक्झोटने आपल्याप्रमाणेच सँकोलाही वेडगळ बनवून टाकले आहे, असे त्या पाटलाला आणि न्हाव्याला वाटले. सँकोचे खाणेपिणे आणि विश्रांती झाल्यावर ते तिघेहीजण डॉनकडे जाण्यास निघाले. डोक्यात सरदारकीचे आणि त्यांच्या पराक्रमाचे वेड भरून राहिलेल्या डॉन क्विक्झोटला पुन्हा घरी परत आणणे हे काम फार कठीण होते. ते तिघे विचार करू लागले.

जाता जाता त्यांना वाटेत काही लोक भेटले. त्यांच्याशी पाटील आणि निकोलस यांचे बरेच बोलणे झाले. त्या लोकांमध्ये एक चतुर स्त्री होती. डॉनसारख्या वेड्या माणसाला ताळ्यावर आणण्यास आपण मदत करू आणि त्याला घरी येण्यास भाग पाडू असे ती म्हणाली. त्याप्रमाणे तिला घेऊन ते डॉनकडे गेले.

## राजकन्येच्या सुटकेसाठी

१२

पाटीलबुवा, निकोलस न्हावी आणि ती पाहुणी स्त्री यांनी वेड्या डॉनला ताळ्यावर आणण्यासाठी एक बेत ठरविला. त्या पाहुण्या स्त्रीने एका राजकन्येचा वेष घ्यायचा, ही राजकन्या म्हणजे एका मोठ्या संकटात सापडलेली स्त्री आहे असे भासवायचे, मग तिची तक्रार सरदार डॉन क्विक्झोट यांच्याकडे न्यायची, असा बेत त्यांनी आखला. कारण संकटात सापडलेल्यांना मदत करणे हा डॉनचा

आवडता उद्योग होता या स्त्रीने डॉनकडे आपले गाऱ्हाणे पुढीलप्रमाणे मांडायचे : एका दुष्ट राक्षसाने माझे राज्य हिरावून घेतले आहे. त्याचा बंदोबस्त करून माझे राज्य परत मिळविण्यासाठी आपण तावडतोब काहीतरी करा.

असा बेत ठरवून सर्वजण सेबल् टेकडयांकडे गेले. तेथे डॉन क्विक्झोटची स्वारी विचारमग्न स्थितीत बसली होती ठरल्याप्रमाणे ती स्त्री डॉनसमोर गुडघे टेकून उभी राहिली व ठरल्याप्रमाणे तिने आपले गाऱ्हाणे डॉनपुढे मांडले. तिची ती केविलवाणी अवस्था पाहून डॉन एकदम एखाद्या वीरासारखा उठला आणि सँकोला म्हणाला, " सँको, माझा रोझीनांट घोडा तयार ठेव." आपले चिलखत अंगावर चढवून डॉन म्हणाला, " हे राजकन्ये, तुझ्यावर संकट आणणारा हा राक्षस कोणीहीं असो, मी तावडतोब त्याचा निकाल लावतो. पण तू कोण आहेस ते प्रथम मला सांग." त्यावर सँको म्हणाला, " महाराज, ही एक दुर्दैवी राजकन्या आहे ! "

या वेळी निकोलस या न्हाव्याने राजकन्येच्या हुजऱ्याचा वेष घेतला होता. त्याने नकली दाढी लावली होती. हा सगळा प्रकार पाहून त्याला हसू येत होते. पण त्याने आपले हसू आवरले आणि सरदार डॉन क्विक्झोट यांना तीन वेळा खाली वाकून मुजरा केला. डॉनला मात्र ही सारी हकीकत खरी वाटली.

पाटीलबुवा म्हणाले, " सरदारसाहेब, आपण हे परोपकाराचे मोठे काम हाती घेतले आहे हे पाहून मला फार आनंद झाला. " पाटीलबुवांना बसायला घोडा नसल्याने डॉनला बरे वाटेना. तो म्हणाला, " राजकन्ये, माझी एक गोष्ट ऐक. तुझ्या हुजऱ्याचे खेचर आमच्या पाटीलबुवांना दे. ते पायी चाललेले पाहून मला बरे वाटत नाही.

त्यावर पाटीलबुवा पुढे बसतील व तुझा हुजऱ्या मागे बसेल."

राजकन्या म्हणाली, "ठीक आहे. माझ्या हुजऱ्याला ही गोष्ट मान्य आहे." आता राजकन्या आपल्या घोड्यावर सर्वांच्या पुढे होती. तिला पाटलाने विचारले, "राजकन्ये, तू आता आम्हांला कोठे नेत आहेस?"

त्यावर राजकन्या म्हणाली, ",कोठे म्हणजे? मिकॉपिकन देशात. तेच माझे राज्य आहे आणि तेच त्या राक्षसाने हिरावून घेतले आहे. हे सरदारसाहेब ते मला परत मिळवून देणार आहेत."

डॉन क्विक्झोट म्हणाला, "होय, अशी कामे करण्याची मला हौस आहे, एवढे मात्र खरे. पण काय हो पाटीलबुवा, तुम्ही येथे कसे?"

पाटीलबुवा म्हणाले, "त्याचं असं झालं, आपले निकोलस न्हावी आहेत ना, त्यांच्याबरोबरच मी सिव्हिली या गावी गेलो. त्या ठिकाणी येणे असलेली माझी बरीच रक्कम वसूल झाली. आम्ही घरी परत येत असताना काल काही चोरांनी आमच्यावर हल्ला केला व आमची सर्व संपत्ती त्यांनी लुटली. हे लुटारू म्हणजे पूर्वीचे कैदी होते. पण त्यांच्याबरोबर असलेल्या हत्यारबंद शिपायां-पासून कोणीतरी त्यांची सुटका केली, असे मला कळले. हा त्यांची सुटका करणारा माणूस एक पक्का लुच्चा आणि लुटारू असावा, असे मला वाटते." हे सर्व आपल्यावरच येत आहे असे सरदार डॉन क्विक्झोट यांच्या लक्षात आले त्यांचा चेहरा पडला आणि त्या वेळी तरी त्यांना काहीच बोलता येईना.

□ □ □

## खाणावळीतील राक्षसाचा वध

१४ प्रवास करता करता वाटेत दुसऱ्या दिवशी या मंडळींना पूर्वीच्या खाणावळीत उतरण्याची वेळ आली. या जागेची डॉनला भीतीच बसली होती. खाणावळवाला, त्याची बायको, मुलगी आणि मोलकरीण यांना डॉन क्विक्झोट आणि सँको दिसताच मोठी गंमत वाटली. सर्वांनी त्यांचे स्वागत केले. एका बऱ्यापैकी खोलीत डॉनची व्यवस्था करण्यात आली. सरदारसाहेब ताबडतोब तेथे जाऊन आडवे झाले. त्याच्या बरोबरच्या मंडळींनी दुसऱ्या खोलीत एकत्र जमून जेवण केले. डॉनच्या डोकेफिरूपणाबद्दल जेवता जेवता सर्वांची चर्चा चालली होती. इतक्यात सँको एकाएकी धावत आला व म्हणाला, "धावा, धावा, घात झाला! सरदारसाहेबांच्या मदतीला चला. त्यांनी घनघोर युद्ध सुरू केले आहे. त्या राजकन्येला संकटात टाकणाऱ्या राक्षसाशी त्यांनी युद्ध आरंभिले आहे."

त्याच वेळी खोलीमध्ये डॉन क्विक्झोटनी गर्जना मोठमोठ्याने ऐकू येत होती, "भोग आता आपल्या कर्माचे प्रायश्चित्त! चोर, लुटारू!" या शब्दांबरोबरच फटक्यांचे आवाजही ऐकू येत होते.

सँको ओरडला, "नुसते ऐकत उभे राहू नका. सरदारजींच्या मदतीला चला. आत्तापर्यंत बहुतेक तो राक्षस जिवंत राहिला नसेलच. मी स्वतः आपल्या डोळ्यांनी खोलीबाहेर रक्ताचे पाट वाहत असलेले पाहिले."

"हाय रे दैवा!" खाणावळवाला ओरडला, "मला वाटते, डॉनने त्याच्या बिछान्याजवळच असलेल्या दारूचा बुधलाच

फोडला तर नाही ना ? " असे म्हणत तो तावडतोब त्या खोली-कडे धावला. त्याच्या मागोमाग सर्व मंडळी गेली. आत जाऊन



पाहतात तर काय, डॉन क्विक्झोटच्या अंगात युद्धाचा संचार झाला होता. त्याच्या अंगात एक शर्ट होता. त्याच्या डाव्या हातावर ब्लॅंकेट व उजव्या हातात तलवार होती आणि तीच वेगाने फिरवून एखाद्या राक्षसाशी लढत असल्यासारखा तो ओरडत होता. सगळ्यात गमतीची गोष्ट म्हणजे त्याचे डोळे मिटलेले होते. ते त्याचे स्वप्नच होते. पण तलवारीचे वार मात्र खरेखुरे चालले होते. आपण राक्षसावरच या वेळी तलवारीचे वार करीत आहोत, अशा समजुतीने वार करून त्याने दारूचे बुधले फोडले होते आणि खोलीत दारूचे तळे बनले होते.

हे पाहिल्यावर खाणावळवाला डॉनच्या अंगावर धावून गेला

आणि डॉनला त्याने इतके ठोसे लगावले की, डॉनचे आयुष्य खाणावळवाला आता इथेच संपवितील, असा रंग दिसू लागला. शेवटी निकोलस न्हावी व पाटीलबुवा पुढे आले आणि त्यांनी त्या खाणावळवाल्याला मागे ओढले. शेवटी डॉन क्विक्झोट जागा झाला. पण आपण काय प्रकार केला आहे हे त्याच्या अंगावर एक बादलीभर गार पाणी ओतून तो चांगला शुद्धीवर येईपर्यंत त्याला कळले नाही.

या साऱ्या प्रकाराने खाणावळवालथाला इतका राग आला होता की, झालेले सर्व बिल देऊन दारूचे बुधले होते तसे शिवून दिल्याशिवाय या जोडीला सोडायचे नाही, असे त्याने ठरविले. पाटीलबुवांनी डॉनला बाजूला घेतले आणि त्याची समजूत घातली. तरीही आपण जणू काही त्या राजकन्येशीच बोलत आहोत अशा थाटात तो म्हणाला, " राजकन्ये, आता तुला शांततेने राज्य करण्यास हरकत नाही. कारण तुला त्रास देणाऱ्या राक्षसाचा मी नायनाट केला आहे. " हे सर्व प्रकरण पाहून त्या खाणावळवाल्याखेरीज सर्वजण खो खो हसू लागले. पण डॉन क्विक्झोट बिछान्याकडे गेला आणि लवकरच झोपी गेला.

सगळे लोक पुन्हा आपल्या खोलीत गेले. " डॉनने सगळा सत्यानाश करून टाकला. " असे ओरडून खाणावळवाल्याची बायको पुन्हा पुन्हा तक्रार करू लागली. पाटीलबुवांनी झालेले सर्व नुकसान भरून देण्याचे आश्वासन खाणावळवाल्याच्या बायकोला दिले. त्या राजकन्येनेही आपल्या राज्यातील एक मोठी जागा सँकोला देण्याचे कबूल केले. पण सँकोचे ते समाधान क्षणभंगुर होते. कारण त्यांचे हे बोलणे चालू होते तोच एक गृहस्थ तेथे आला आणि ' ती राजकन्या आपली बायकोच असून कित्येक वर्षे ती बेपत्ता होती ' असे सांगू लागला. त्या दांपत्याच्या भेटीने सर्वांना

आनंदी-आनंद झाला. सँको ताबडतोब डॉनच्या खोलीत गेला. तो म्हणाला, " सरदारसाहेब, एखाद्या राज्याचे आधिपत्य मिळविणे, राजकन्येला सिंहासन मिळवून देणे आणि मला एखादे अधिकारपद देणे, यासारखे विचार करून आता आपल्या डोक्याला ताप देऊ नका. या सगळ्याच गोष्टींचा आता निकाल लागला आहे. "

डॉन म्हणाला, " मी त्या राक्षसाचे मुंडके उडविले. त्याच्या रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. साऱ्या खोलीभर रक्ताचा पाण्यासारखा प्रवाह वाहत होता हे तरी खरे की नाही ? "

सँको म्हणाला, " नाही ! नाही ! ! नाही ! ! ! " सरदारसाहेब, ते खरे नाही. " हे ऐकून डॉन घाईने म्हणाला, " माझे कपडे आण पाहू. म्हणजे मी स्वतःच हा सारा प्रकार पाहून येतो. "

सँकोने डॉनचे कपडे दिले. तिकडे पाटीलबुवांनी राजकन्येच्या नवऱ्याला डॉनच्या चक्रमपणाची सर्व हकीकत सांगितली. डोरोथीने योजलेला पहिला डाव येथेच संपला होता. तेव्हा डॉनला घरी नेण्यासाठी काही नवीन बेत ठरविणे जरूर होते. डोरोथीच्या नवऱ्यानेही या नवीन कार्यात डोरोथीचा काही उपयोग करता येत असेल तर आपली त्याला हरकत नाही, असा खुलासा केला.

## पुन्हा घरी परत

१५

पाटीलबुवा व निकोलस न्हावी यांची आता मात्र पुरी खात्री झाली की, डॉनला भुताटकीनें पुरतेच पछाडले आहे. तेव्हा या गोष्टीचा फायदा घेऊन त्याची घरापर्यंत उचलबांगडी करावी असे त्यांनी ठरविले. आत्तापर्यंतच्या सर्व प्रसंगांत व डॉनला आलेल्या अनुभवांत

सगळीकडे त्याच्या वाटणीला पराभव आणि दु:ख या गोष्टीच आल्या. त्यामुळे त्याने स्वत:ला 'रडक्या चेहऱ्याचे सरदार' असे नाव घेतले. गोफणीतील दगडांच्या माऱ्याने त्याचे दात पडल्याने त्याच्या तोंडाला बोळक्याचे स्वरूप आले होते. आपल्याला आलेल्या अपयशांना भुताटकी आणि जादू या गोष्टी कारण आहेत असे डॉनला वाटे. तो स्वत:कडे किंवा आपल्या पराक्रमाकडे कमीपणा घेण्यास केव्हाही तयार नव्हता. त्याचे झालेले हाल त्याच्या मित्रांच्या लक्षात येत होते व म्हणूनच त्याला कसे तरी घरी परत आणण्याचा त्यांचा हेतू होता. पाटीलबुवा आणि निकोलस न्हावी यांनी काहीतरी कारस्थान रचून डॉनला घरी आणण्याचे ठरविले.

निकोलस न्हाव्याने एका सुंदर, भटक्या स्त्रीचा वेष घ्यायचा, आणि पाटलाने तिच्या हुजऱ्याचा वेष घ्यायचा. या नवीन स्वरूपात त्यांनी डॉनच्या शोधात हिंडायचे. डॉन दिसताच त्या स्त्रीने त्याच्या समोर जाऊन त्याच्या पाया पडून आपल्यावरील संकटांचे रसभरित वर्णन करायचे. सरदारकीच्या सुखस्वप्नांनी भरकटलेला डॉन त्या स्त्रीची विनंती मान्य करणारच! मग तिने त्याला आपल्या मागोमाग थेट घरापर्यंत आणल्यावर त्याला त्याच्या सरदारकीच्या सुखस्वप्नातून जागे करून त्याला वस्तुस्थितीत आणून सोडण्याचा प्रयत्न करायचा, असा त्यांचा बेत होता.

परंतु त्याच्या पूर्वीच्या हुजऱ्याला मिळालेला चेंडूच्या खेळाचा अनुभव, गोफणीतील दगडांचा मारा, असे अनेक प्रसंग येऊन सुद्धा हे भुताटकीचे प्रकार आहेत, असे त्याने सँकोला सांगितले होते. यामुळे तसलेच एखादे कारस्थान करून डॉनला घरी न्यावे असे पाटीलबुवा आणि निकोलस यांनी ठरविले.

पाटीलबुवा आणि निकोलस यांनी एक गाडीवाला गाठला

त्याची गाडी भाड्याने घेतली. गजांचा एक पिंजरा करून तो त्या गाडीत घट्ट बसविला. हा पिंजरा सर्कशीतल्या वाघ-सिंहांचा पिंजरा असतो तसा दिसत होता. त्यात एका माणसाला बसण्यास अगर पडून राहण्यास पुरेशी जागा होती

खाणावळीत असलेल्या पुष्कळशा लोकांना पाटीलबुवांनी आपल्या या कामात मदतीला बोलाविले. या सर्वांना काळ्या झग्यांचा पोशाख दिला. या झग्यांना डोळ्यापुरतीच दोन भोके ठेविली होती. नंतर ते डॉन क्विक्झोटच्या खोलीत गेले. त्या खोलीत तो गाढ झोपला होता. त्यांनी डॉनचे हातपाय घट्ट बांधले. डॉन जागा होऊन चुळबूळ करू लागला. त्याने डोळे उघडले व चाललेला प्रकार पाहिला. भोवतालची ही सारी भुते असून आपल्यावर काही भुताटकी चालली आहे असेच त्याच्या मनाने घेतले. त्याने डोळे मिटून घेतले. तो एक शब्दही बोलला नाही. त्या सर्व लोकांनी त्याला हळूच बिछान्यावरून उचलले. हळूहळू त्या पिंजऱ्याकडे नेऊन त्यात त्याला व्यवस्थित ठेवले आणि दार लावून घेतले. सँको मात्र बावरून गेला. आपल्या धन्याचा हा काय प्रकार चालला आहे, हे त्याच्या लक्षात येईना. डॉनला झोपेतून बाहेर नेत असताना निकोलस न्हावी जरा करड्या स्वरात बोलू लागला, " अहो रडक्या चेहऱ्याचे सरदार ! ह्या संकटाचा तुम्हांला मुळीच त्रास होणार नाही. ह्यातून तुम्ही सुखरूपपणे निभावून जाल. लक्षात ठेवा; तुमचे सगळे पराक्रम यशस्वी होण्यासाठी हे चालू असलेले संकट अत्यावश्यक आहे. आणि अरे आज्ञाधारक सँको, तुझ्या धन्याला अशा प्रकारे नेत असताना तू मुळीच फिकीर करू नकोस. कारण शेवटी तुला दिलेली सर्व आश्वासने पूर्ण केली जाणार आहेत. "

निकोलसच्या ह्या घोषणेने डॉनला समाधानच वाटत होते.

आणि तो निर्धास्तपणे पिंजऱ्यात पहुडला होता. अशा प्रकारे ती मिरवणूक सरदार डॉन क्विक्झोट यांच्या घराकडे चालली होती. सर्वांपुढे पिंजऱ्याची गाडी, तिच्या प्रत्येक बाजूला काळे डगलेवाले, त्यामागे गाढवावरील सँको, त्याच्याबरोबर डॉनचा रोझिनांट घोडा व सर्वांमागे आपापल्या खेचरावर बसलेले पाटील व निकोलस न्हावी ! अशी ही एक मजेशीर मिरवणूकच होती. पुढे चाललेल्या बैलांच्या गतीने ही मिरवणूक चालली होती. बैलगाडीवरील पिंजऱ्यात सरदार डॉन क्विक्झोट हात-पाय ताणून पसरले होते.

दुसऱ्या दिवशी वाटेत त्यांना मुक्काम करावा लागला. एका निसर्गरम्य खिंडीत ते विश्रांतीसाठी थांबले. गाडीवाल्याने आपले बैल जवळच चरायला सोडले. " अहो, आमच्या धन्याला थोडा वेळ पिंजऱ्याबाहेर सोडा. ते काही कोठे पळून जाणार नाहीत याची मी हमी घेतो. " अशी सँकोने पाटीलबुवांना विनंती केली. पण कोणी त्याकडे लक्ष दिले नाही.

इतर सर्वजण जवळच्या खाणावळीत जेवायला गेले. नंतर झाडाखाली एक बैठक टाकून तेथे सारेजण बसले. तेवढ्यात जवळच्या झाडीतून एक कोकरू धावत धावत आले व या लोकांत शिरले. त्याच्या मागोमाग एक धनगर त्याला पकडायला आला. धनगराने निकोलसला विचारले, " काय हो, त्या पिंजऱ्यात पसरलेला तो माणूस कोण आहे ? तो असा काय पाहतो आहे ? आणि असा काय बोलतो आहे ? "

निकोलस म्हणाला, " काय, तुला ठाऊक नाही ? अहो तो डी ला मांचा येथील प्रसिद्ध सरदार डॉन क्विक्झोट आहे. सगळ्या संकटांना हद्दपार करणारा, मोठमोठ्या राक्षसांचा काळ आहे तो. त्याने अनेक युद्धे जिंकली आहेत. "

धनगर म्हणाला, " ह्या गोष्टी आम्ही पुस्तकात वाचतो. तुम्ही आमची चेष्टा करता काय ? का त्या सरदाराच्या मेंदूत काही बिघाड झाला आहे ? "

हे सारे बोलणे डॉनने ऐकले. तो पिंजऱ्यातून ओरडून बोलला, " मूर्खा, कोणाच्या मेंदूत बिघाड झाला आहे ? तूच बिनडोक दिसतो आहेस चालता हो येथून " असे म्हणून त्याने पावाचा एक कडक तुकडा त्या धनगराकडे इतक्या जोरात भिरकावला की तो त्याच्या नाकाडाला लागला. ही थट्टा त्याला सहन झाली नाही. तो एकदम संतापला आणि धावत जाऊन त्याने डॉनवर झेप घेतली. तो डॉनचा गळा दाबणार इतक्यात सँको पांझा पुढे आला आणि त्याने धनगराला इतक्या जोरात मागे ढकलले की तो बैठकीवरील कपबशांच्या ढिगावर आदळला आणि साऱ्या कपबशा फुटल्या.

डॉन क्विक्झोटने आपली बंधने सोडली आणि तो त्या धनगराकडे धावला. त्यांची खूपच मारामारी झाली. सँको आपल्या धन्याच्या मदतीला धावला, पण त्यालाच जास्त मार खावा लागला. हा मारामारीचा प्रकार पाहून पाटील व निकोलस यांची हसून हसून पुरेवाट झाली. शेवटी त्यांनी पुढे होऊन ती मारामारी कशीबशी थांबविली. पुन्हा डॉनला पिंजऱ्यात बसविण्यात आले. मग त्यांचा प्रवास पुढे चालू झाला. डॉनची ही मिरवणूक रें रें करीत दुपारच्या सुमारास त्याच्या खेडेगावी येऊन पोचली.

रविवारचा दिवस असल्यामुळे बाजारात लोकांची गर्दी होती. त्या गर्दीतूनच ही मिरवणूक जात होती. ही विलक्षण मिरवणूक पाहण्यासाठी प्रत्येकजण पुढेपुढे येत होता. घरांच्या खिडक्या-खिडक्यांतून डोकी बाहेर आलेली दिसत होती. त्या पिंजऱ्यात शिकार केलेला एखादा वाघ किंवा सिंह असावा असे प्रथम लोकांना

वाटले. पण आपल्या गावच्याच डॉन क्विक्झोटला जेव्हा लोकांनी ओळखले, तेव्हा त्यांच्या आश्चर्याला सीमा उरली नाही.

डॉन क्विक्झोट घरी परत आला आहे ही वार्ता सँको पांझा याच्या घरीही पोहोचली. तेव्हा त्याची बायको मोठया उत्सुकतेने पुढे आली. प्रथम तिने आपले गाढव सुरक्षित परत आले किंवा नाही याची चौकशी सुरू केली. सँको म्हणाला, "गाढवाबद्दल प्रथम चौकशी केलीस हे ठीक झाले. त्याच्या धन्यापेक्षा त्याची तब्येत नक्कीच चांगली आहे."

ती म्हणाली, "ही ईश्वराची कृपाच म्हटली पाहिजे. पण काय हो, तुम्हांला या सरदारसाहेबांच्या हुजऱ्याचे काम मिळाल्याने काय पदरात पडले? मला एक सुंदरसा दागिना आणि आपल्या मुलीकरता सुरेखशा चपला तरी आणल्या का तुम्ही?"

सँको म्हणाला, "खरं सांगायचं म्हणजे मी काहीच आणलं नाही; पण एक महत्त्वाची बातमी मात्र आणलीय पुन्हा जर मी सरदारसाहेबांबरोबर प्रवासाला गेलो तर एखाद्या बेटाचा राजा होऊन येईन. मग तू होशील राणी!" अशा प्रकारे त्यांचा संवाद चालला असता डॉनच्या पुतणीने डॉनला खोलीत नेऊन त्याच्या पलंगावर व्यवस्थित झोपविले. पाटीलबुवा म्हणाले, "आता याची जास्त काळजी घ्या बरं. याच्या डोक्यात सरदारकीचा संचार होऊन तो पुन्हा निसटून जाणार नाही असे पाहा."

□ □ □

# सिंहाशी झुंज करणारा सरदार

१६

डॉन क्विक्झोट घरी परत आल्यापासून सुमारे एक महिनाभर पाटीलबुवा व निकोलस न्हावी यांनी त्यांच्या खोलीत पाऊल टाकले नाही. प्रकृती सुधारण्यासाठी डॉनला विश्रांतीची आवश्यकता होती. जुन्या काळचे सरदार लोकांचे पराक्रम आणि त्यांची रोमांचकारी कृत्ये या गोष्टी त्याच्या डोक्यातून पार निघून जाव्यात यासाठी त्यांचे प्रयत्न चालू होते. पाटील आणि निकोलस यांच्याशी गप्पा मारताना पुन्हा स्वारी रंगात येऊन तिच्या अंगात सरदारकीचा संचार व्हायचा आणि नको तो प्रसंग पुन्हा उभा राहायचा अशी साऱ्यांना भीती वाटत होती. असे थोडे दिवस गेले. सारेजण डॉन क्विक्झोटच्या पाळतीवर होते. मधून मधून डॉनच्या वागण्यावरून पुन्हा एकदा आपले सरदारजी निघून जाणार अशी चिन्हे दिसत. हा बेत त्याच्या मनातून फार हद्दपार करून टाकावा, असा साऱ्यांनी प्रयत्न केला. पण सगळे प्रयत्न फोल ठरत होते. सँको पांझा पुन्हा पुन्हा डॉनशी गप्पा मारण्यासाठी येऊ लागला. डॉनच्या खोलीत ते दोघेजण तासन् तास गप्पा मारू लागले. आणि ते दोघे लवकरच नवीन प्रवासाला निघणार की काय अशी शंका येऊ लागली.

एके दिवशी बोलता बोलता सँको डॉनला म्हणाला, " हे पाहा सरदारसाहेब, बोलून चालून आपण माणसं ! आज आहोत, उद्या नाही ! तेव्हा पुढं केव्हातरी मलाच एखाद्या बेटाचं राज्य मिळणार आहे यावर विश्वास ठेवायला मी तयार नाही. माझ्यासारखा मदतनीस जर तुम्हांला हवा असेल तर दरमहा थोडी रक्कम मला पगार म्हणून द्यावी. "

त्यावर डॉन म्हणाला, "सँको, तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे. तुला पगार द्यायला माझी कोणतीच अडचण नाही. पण आत्ता-पर्यंत जे सरदार होऊन गेले त्यांनी असा पगार दिलेला माझ्या वाचनात नाही. ज्यांनी त्यांची सेवा केली त्यांना त्यांनी जिंकलेला राज्याचा एखादा भाग दिला, असं माझ्या वाचनात आहे."

सँको म्हणाला, "ठीक आहे, तुम्हांला माझी जरूरी असेल तर मुळीच संकोच करू नका." हे त्या दोघांचे बोलणे चालू आहे तोच बाहेरून रोझीनांट घोडयाचे खिकाळणे व सँकोच्या गाढवाचे ओरडणे एकदमच ऐकायला आले. हा एक शुभशकुनच झाला असे त्यांना वाटले.

दुसऱ्या दिवशी डॉन आणि सँको यांनी मोठ्या उत्साहाने आपला प्रवास सुरू केला. आपण जगातील एक मोठे सरदार आहोत आणि भुताटकी किंवा जादू यांची आपण मुळीच पर्वा करणार नाही, अशा विचारात डॉन मोठ्या उत्साहाने बाहेर पडला. आता यापुढे येणारे सारे प्रसंग आपणाला सुखकारक होतील अशी त्या दोघांना खात्री वाटत होती.

थोडा प्रवास करतात न करतात तोच त्यांना वाटेत खेचरे जोडलेली एक गाडी भेटली. गाडीत दोन माणसे होती व गाडीच्या मागे पिंजऱ्यासारखा एक भाग होता. डॉनला हे दृश्य दिसताच त्याने आपला रोझीनांट घोडा पुढे सरसावला आणि ती गाडी अडवून धरली. ती गाडी कोणाची आहे आणि आत काय आहे याबद्दल त्यांनी चौकशी केली. गाडीवान म्हणाला, "ही गाडी माझीच आहे. आणि यात मागच्या बाजूला भयंकर सिंह आहेत. ते एका राजाला भेट म्हणून द्यायला आम्ही चाललो आहोत."

"सिंह बरेच मोठे आहेत की छोटी पिले आहेत?" डॉनने

विचारले. सिंहांबरोबर असलेला दुसरा माणूस म्हणाला, " स्पेनमधील सर्वांत मोठे असे हे सिंह आहेत. यांना आज काहीही खायला घातले नसल्याने ते भुकेले आहेत, तेव्हा तुम्ही आमची वाट अडवू नका, म्हणजे आम्हांला वेळेवर पोहोचता येईल. " पण डॉन क्विक्झोट तेथून थोडाही हालला नाही. उलट तो म्हणाला, " या सिंहांच्या पिंजऱ्याचा दरवाजा उघड. यांतील एका सिंहाबरोबर युद्ध करण्याची ताकद माझ्यात आहे, हे मला जगाला दाखवून द्यायचं आहे. "

सँको, तो गाडीवान आणि तो सिंहांचा राखणदार यांनी डॉनला नाना प्रकारे सांगून पाहिले; पण त्याचा निश्चय कायम होता. सिंहांच्या रखवालदाराने जर दरवाजा खोलला नाही तर त्याला तावडतोब आपल्या भाल्याने भोसकण्याची डॉनने धमकी दिली. दरवाजा उघडून सिंह बाहेर पडल्यास आपली धडगत नाही असे वाटून बाकी सारेजण बाजूला जाऊन उभे राहिले आणि त्या रखवालदाराने हलकेच पिंजऱ्याचा दरवाजा उघडला.

दरवाजा उघडल्याबरोबर पिंजऱ्यातील सिंह उठून उभा राहिला व आतल्या आत गोलगोल फिरला. त्याने आपले सर्व अंग ताणून दिले व मोठी जांभई देताना त्याने आपला जबडा वासला. तेव्हा त्याचे ते भयंकर रूप पाहून सर्वांचीच घाबरगुंडी उडाली. सिंह पुन्हा त्या उघडलेल्या दरवाज्याजवळ बसला आणि चाटून चाटून आपले अंग स्वच्छ करू लागला. शरीराची साफसफाई झाल्यावर त्याने एकदा डोळ्यांची उघडझाप केली. दरवाज्याबाहेर सर्व दिशांना एकवार नजर फिरविली. पण खाली पवित्र्यात तयार असलेला सरदार डॉन क्विक्झोट याच्याकडे मुळीच पाहिले नाही. अगर बाहेर उडी घेतली नाही. पिंजऱ्यातल्या पिंजऱ्यात त्याने

पुन्हा गिरकी मारली व तो होता तसा स्वस्थ पडून राहिला. हा सर्व प्रकार डॉनने पाहिला. त्या सिंहाच्या रखवालदाराला सिंहाला डिवचून त्याने बाहेर काढण्यास सांगितले. पण त्याला तसा धीर झाला नाही. डॉन क्विक्झोटचे सामर्थ्य आणि त्याचा पराक्रम यांची माहिती रखवालदाराला कळली. मग तो म्हणाला, "महाराज, कोणाही वीराची या सिंहाशी द्वंद्वयुद्ध करण्याची छाती झाली नाही. सिंहाला बाहेर येऊन तुमच्याशी द्वंद्वयुद्ध करण्यासाठी तुम्ही भरपूर वेळ दिला आहे. इतके करूनही तो जर पिंजऱ्याबाहेर येत नसेल तर तो त्याचा पराभव आहे, आणि तुमचाच विजय आहे."

डॉन म्हणाला, "खरं आहे तुझं म्हणणं ! अगदी खरं आहे. तर मग आता पिंजऱ्याचा दरवाजा भक्कम लावून घे. आणि तू काय काय पाहिलंस, एका भयंकर सिंहाला मी कसं हरविलं ते तू तुझ्या मित्रांना रंगवून सांग."

पिंजऱ्याचा दरवाजा बंद केल्यावर सँको आणि तो गाडीवान असे सर्वजण पिंजऱ्याजवळ आले. या भयंकर संकटातून काहीही दुखापत न होता डॉन सुखरूप आणि जिवंत राहिला याबद्दल साऱ्यांना आश्चर्य वाटले. सिंहाच्या रखवालदाराने घडलेली हकीकत रंगवून सांगितली आणि डॉन क्विक्झोटच्या शौर्याची वाखाणणी केली. डॉन क्विक्झोट खूष झाला होता. त्याने सँकोला त्या सर्वांना प्रत्येकी एक एक सोन्याचे नाणे द्यायला सांगितले. त्याप्रमाणे सोन्याची नाणी मिळाल्यावर त्यांनी डॉनचे आभार मानले. रखवालदाराने राजाकडे पोचल्यावर दरबारात डॉनच्या पराक्रमाचे वर्णन करण्याचे डॉनला वचन दिले. मग ते सारेजण सिंहाच्या गाडीसह पुढे जायला निघाले. जाता जाता डॉनने त्या सर्वांना पुन्हा बजावून सांगितले, "आता राजापुढे माझ्या पराक्रमाचे

वर्णन करताना मी डॉन क्विक्झोट-डी ला मांचा असून मला यापुढे 'सिंहाशी झुंज देणारा सरदार' या शब्दांनी ओळखण्यात येणार आहे, असेही त्याला सांगा.

## नको ते राज्य !

१७

पुढे काही दिवसांनंतरची गोष्ट. सरदार डॉन आणि सँको एका जंगलातून दौडत चालले होते. थोड्याच अंतरावर त्यांना एक स्त्री पांढऱ्या घोड्यावर बसून आपल्याच बाजूला दौडत येत असलेली दिसली. त्याबरोबर तिच्याशी बातचीत करण्यासाठी डॉनने आपला घोडा तिकडे वळविला.

ती स्त्री म्हणजे एका पराक्रमी सरदाराची पत्नी होती. सरदार डॉन आपल्याकडे येत आहेत असे पाहून तिने त्यांचे मोठ्या नम्रतेने स्वागत केले. ती म्हणाली, "महाराज, येथून जवळच आमचा किल्ला आहे. आपण जर आमच्याकडे मुक्काम केलात तर आम्हां उभयतांना फार आनंद होईल" हे बोलणे ऐकून सरदारजींनाही आनंद झाला. त्यांनी ते निमंत्रण स्वीकारले. किल्ल्यात पोहोचल्यावर ड्यूक, डचेस आणि त्यांचे सर्व नोकरचाकर यांनी डॉन आणि सँको यांचा मोठ्या सन्मानाने पाहुणचार केला. सरदारजींच्या पराक्रमाच्या कथा त्यांनी ऐकलेल्या होत्या. म्हणूनच त्यांनी सरदारजींची थोडी गंमत करण्याचे ठरविले.

दुपारचे चमचमीत जेवण मनसोक्त झाल्यावर सर्वांनी सरदार डॉन क्विक्झोट यांना आपल्या पराक्रमाचे वर्णन करण्याचा पुन्हा पुन्हा आग्रह केला. डॉननेही आपले पराक्रम तिखटमीठ लावून

मोठ्या रसाळपणाने वर्णन केले मधून मधून सँको त्याला अडवी, कारण त्याला एक स्वतंत्र बेट देण्याचे आश्वासन अनेक वेळा मिळाले होते. पण ते पूर्ण झाले नव्हते. ही गोष्ट ड्यूकच्या लक्षात येताच ते सँकोला म्हणाले, " एवढंच ना ? तर मग तुला लवकरच एका बेटाचा राजा करण्यात येईल. इतकंच काय, पण डॉन क्विक्झोट यांच्या वतीनं या क्षणालाच मी तुला एका राज्याचं वचन देतो. मग तर झालं ना ? "

थोड्याच दिवसांत ड्यूकने सँकोच्या बरोबर मोठा लवाजमा देऊन त्याला एका बेटावर राजा म्हणून पाठविले आणि डॉनला पाहुणचारासाठी ठेवून घेतले. एक लांबलचक भरजरी झगा घालून आणि बरोबर बराचसा लवाजमा घेऊन सरदार सँको नवीन राजे म्हणून आपल्या खेचरावर बसून मिरवणुकीने त्या बेटावर आले.

सँकोची स्वारी शहरात येऊन दाखल झाल्यावर सर्व अधिकारी त्याला सामोरे आले. घंटा वाजू लागल्या. बँडची सलामी झाली आणि राजे सँको दरबारहॉलजवळ येऊन ठेपले. शहराच्या किल्ल्या विधिपूर्वक त्यांच्या ताब्यात देण्यात आल्या. बॅरॅटेरिया बेटाचे अधिराज्य त्यांच्याकडे सोपविण्यात आले.

ड्यूकचा गुप्त डाव ज्यांना माहीत नव्हता, त्यांना हे नवीन राजेसाहेब पाहून मोठे आश्चर्य वाटले. त्यांची ती वामनमूर्ती, तो गबाळा पोषाख, ती वाढलेली दाढी आणि तो बावरलेला चेहरा हे पाहून सर्वांनाच मोठी गंमत वाटली. थोड्याच वेळात राजे-साहेबांना फार भूक लागलेली आहे हे लक्षात येताच त्यांना राजवाड्याकडे नेण्यात आले. तेथे एका मोठ्या दिवाणखान्यात मेजवानीची तयारी केली होती. सँकोच्या तोंडाला पाणी सुटले. राजेसाहेबांचे खरे वैभव आता सुरू झाले आहे असे त्यांना वाटले.

सर्वांत उच्च स्थानी मांडलेल्या खुर्चीवर राजेसाहेबांची स्वारी जाऊन बसली. त्या खुर्चीशेजारीच हातात लहानशी काठी घेऊन एक डॉक्टर येऊन उभे राहिले होते. प्रार्थना म्हणण्यात आली. एका नोकराने सँकोच्या हनुवटीखाली एक रेशमी रुमाल बांधला. फळांच्या फोडींनी भरलेली एक बशी सँकोसमोर ठेवण्यात आली. पण त्यातील एक फोड उचलून सँको त्याची चव घेतो न घेतो तोच शेजारी असलेल्या डॉक्टरने आपल्या हातातील काठीने बशीला स्पर्श केला आणि क्षणार्धात ती बशी नोकराने हिसकून नेली. तेवढ्यात कोणत्यातरी गोड पक्वान्नाने भरलेली बशी सँको-समोर आली. पण त्याने सुरुवात करण्यापूर्वीच ती पहिल्या बशी-प्रमाणे अदृश्य झाली. हा सर्व प्रकार पाहून राजे सँको आश्चर्य-चकित झाले. त्यांनी आजूबाजूला वळून पाहिले आणि जवळच उभ्या असलेल्या डॉक्टरला विचारल, " काय हो, हे जेवण म्हणजे हातचलाखी दाखविण्याचा एखादा प्रयोग आहे की काय ? "

तेव्हा हातात काठी असलेले ते डॉक्टर मान वाकवून नम्रतेने म्हणाले, " सरकारसाहेब, आपणाला देण्यात येणाऱ्या अन्नाची आम्हांला फार काळजी घ्यावी लागते. मी येथील डॉक्टर आहे. येथील सरकारस्वारीच्या प्रकृतीची देखभाल करण्याचे काम मज-कडे सोपविले आहे. त्यासाठी तर मला दरमहा पगार देण्यात येत असतो. कोणतेही अपायकारक अन्न आपल्या पोटात जाणार नाही, हे आम्हांला डोळ्यांत तेल घालून पाहावे लागते. "

सँको म्हणाला, " डॉक्टरसाहेब, येथे टेबलावर मांडलेल्या सर्व बशांवर तुम्ही एकदा नजर टाका. आणि सर्वांत चांगले अन्न कोणत्या बशीत आहे ते मला लवकर सांगा. "

डॉक्टर म्हणाले, " तर मग माझा सल्ला असा : ती एका

बशीत असलेली छोटी बिस्किटे आपण खावीत. ती पचायला हलकी व प्रकृतीला उत्तम आहेत." ते ऐकून संको रागाने लाल झाला आणि एकदम डॉक्टरांच्या अंगावर ओरडून म्हणाला, "डॉक्टर-साहेब, तुम्ही आत्ताच्या आत्ता येथून चालते व्हा."

सरकारस्वारी इतकी भडकलेली पाहून डॉक्टर तेथून पळालेच असते; पण तेवढ्यात बिगुल वाजल्याचा आवाज झाला. आणि एका हुजऱ्याने सरकारस्वारीच्या हातांत महत्त्वाच्या कागदांचे एक पुडके दिले. ही सर्व कागदपत्रे ड्यूककडून आली होती. कोणा एका शत्रूचा त्याच रात्री त्या बेटावर हल्ला होणार होता, अशी बातमी त्यात होती. आकस्मिकपणे बेट शत्रूच्या ताब्यात जाऊ नये म्हणून संकोला आधी ही सूचना देण्यात आली होती. ही बातमी तेथील अधिकाऱ्यांना कळताच त्यांनी संकोला ताबडतोब तयारीला लागण्यास सांगितले. बिचाऱ्या संकोला तोंडात एक घासही न घालता मेजवानीतून उपाशीच उठावे लागले. त्या बेटावर एक आठवडाभरसुद्धा संकोने काढला नसेल! सातव्या रात्रीच तो आजारी पडून अंथरुणाला खिळला. पण तेवढ्यात त्याने घंटांचा, तुताऱ्यांचा, ढोलांचा आवाज आणि लोकांचा ओरडा ऐकला. शत्रूचा हल्ला जवळ आला आहे हे लक्षात आल्यावर तो उठून बसला. पलंगावरून खाली उतरला आणि आपल्या राजवाड्याच्या सज्जा-तून त्याने रस्त्याकडे पाहिले. लोकांची खूपच गर्दी झाली होती. त्यांच्याजवळ पेटविलेल्या मशाली होत्या. त्यांनी आपल्या तलवारी उपसल्या होत्या आणि ते ओरडत होते, "सरकारसाहेब, बाहेर शत्रूचा हल्ला आला आहे. तयार राहा. तुमच्या पराक्रमाची शर्थ करा तरच आता आपला बचाव होईल!"

संको म्हणाला, "शस्त्रे घेऊन मी काय करणार? मला

लढाईची मुळीच माहिती नाही."

एकजण म्हणाला, "हे काय ? सरकारसाहेब, तुमच्या मित्रपणाची कमाल झाली. आपले चिलखत चढवा, हत्त्यावर या आणि आमचे पुढारी म्हणून पुढे चला."

सँको म्हणाला, "असे आहे तर चढवा माझ्या अंगावर चिलखत. माझ्या हातात जरूर ती हत्यारे द्या."

एका क्षणात त्या लोकांनी सँकोला मुळीही हलू न देता एक ढाल त्याच्या पोटावर व एक पाठीवर अशा ठेवून, भक्कम दोरांनी गोल गोल वेढे घेऊन जखडून टाकले. सेनापती म्हणून सजलेल्या सँकोला आपले गुडघे हलविता येईनात, की एक पाऊलही पुढे टाकता येईना. नंतर त्याच्या हातात त्यांनी एक भाला आणून दिला आणि त्याला आघाडीवर चलण्यास सांगितले. सर्व लोकांची जबरदस्ती चालू होती म्हणून त्याने पुढे चलण्याचा प्रयत्न केला. इतक्यात सँको ढालीसह कोसळला. काही लोक सँकोच्या अंगावर कोसळत होते. काहींचे तलवारींचे वार सँकोच्या अंगावर असलेल्या ढालीवर होत होते. सँकोला हे इतके असह्य झाले की, आता या संकटातून आपली सुटका कशी होणार या काळजीने त्याच्या पोटात भीतीचा गोळा उभा राहिला. या बेटावर राज्य करणे आणि सत्ता चालविणे ही किती भयंकर गोष्ट आहे, हे त्याला पुरेपूर कळून चुकले. तेवढ्यात सर्व लोकांची विजयाची घोषणा ऐकू येऊ लागली. "आपला जय झाला, शत्रूचा पराभव झाला, आता भिण्याचे कारण नाही. सँकोमहाराज, या जयाचा आनंद लुटा. आपणाला शत्रूपासून केवढी मोठी लूट मिळाली ! सँको सरकारचा विजय असो !" सैनिकांनी सँकोजवळ येऊन त्याच्या ढाली सोडल्या आणि त्याला मोकळे केले. सँको भीतीने आणि जखडून गेल्यामुळे

अर्धमेला झाला होता शेवटी काही सैनिकांनी त्याला त्याच्या खोलीत बिछान्यावर झोपविले आणि ते निघून गेले.

सकाळी दिशा उजळून थोडा प्रकाश दिसू लागला. तेव्हा सँको पलंगावरून उठून लंगडत लंगडत बाहेर आला. त्याचे सारे अंग ठणकत होते. तो सरळ त्याचे गाढव बांधले होते त्या तबेल्याकडे गेला. त्या ठिकाणी ते बिचारे शांतपणे उभे होते. त्याच्या माने-भोवती हात टाकून सँको म्हणाला, " माझ्या सर्व दुःखांचा आज-पर्यंत तू भागीदार होतास, पण मी तुला सोडून राजवाड्यात गेलो आणि हजारो संकटांनी माझ्यावर एकदम झडप घातली." असे म्हणत म्हणत सँकोने गाढवावर जीन चढविले आणि मोठ्या प्रयासाने तो त्यावर बसला. इतक्यात त्याच्याभोवती दरबारातील सारे लोक जमले. तेव्हा सँको त्यांना म्हणाला, " चला, बाजूला व्हा. आता माझ्या वाटेत कोणी येऊ नका. माझे पूर्वीचे स्वातंत्र्य मला पुन्हा मिळू द्या. एखाद्या राज्याचा राजा होण्यासाठी माझे आयुष्य नाही. आपल्या वाटयाला आलेल्या लहान कामापेक्षा मोठी हाव धरणे मूर्खपणाचे आहे. माझ्या हातात एखादा राजदंड असण्यापेक्षा एखादे खुरपेच जास्त शोभून दिसेल. उन्हाळ्यात एखाद्या ओक वृक्षाच्या सावलीत मला आराम वाटेल. मला माझी वाट सोडा." असे म्हणून सँको तेथून निघाला. तो थेट ड्यूकच्या किल्ल्यात परत येऊन पोहोचला.

▭ ▭ ▭

# डॉनचा पुनर्जन्म

१८

डॉन क्विक्झोट आणि सँको पांझा यांची भेट झाली. पुढे ते बार्सेलोना या शहरात गेले. तेथे अंटोनिओ नावाच्या एका गृहस्थाकडे ते काही दिवस राहिले. एके दिवशी डॉन आणि सँको असे दोघेजण पाठीला ढाली बांधून, हातांत भाले घेऊन आणि घोड्यावर बसून समुद्रकिनारी फिरायला



गेले. सूर्य हळूहळू वर येत होता. दूरवर त्यांना शस्त्रांचा प्रकाश दिसला. काही वेळाने तो प्रकाश त्यांच्या जवळ जवळ येत होता.

ते दृश्य पाहून डॉन काहीसा बिचकला. त्याला पुढील दृश्य दिसले : एका पांढऱ्याशुभ्र घोड्यावर एक सरदार बसला होता. त्याच्या ढालीवर पूर्ण चंद्राचे चित्र कोरले होते. सरदाराने फुरफुरणाऱ्या घोड्याला मागे खेचले. घोडा दोन पायांवर उभा राहिला आणि डॉनकडे धाव घेऊ लागला. घोडेस्वार म्हणाला, "डॉन, माझी कीर्ती तू ऐकली असशील ! तू राक्षसांना मारून दारूची पिंपे सांडण्याचा पराक्रम केला आहेस, हे मला माहीत आहे. मला 'शुभ्रचंद्राचा सरदार' म्हणतात. मी तुला युद्धाचे आव्हान देतो. मी तुझा पराभव केला तर हा मरतुकडा घोडा सोडून दे व त्या गाढवावर बसून तुझ्या खेड्यात परत जा."

डॉन भेदरलेल्या डोळ्यांनी हे भाषण ऐकत होता. आता त्याला आपल्या घोड्याची हाडे दिसू लागली. पण त्याने कसेतरी आव्हान स्वीकारले. दोन घोडे दोनशे पावलांच्या अंतरावर उभे राहिले. 'चलो' असा इषारा मिळाला. डॉनने भाला वर करण्याच्या आत समोरचा घोडा भरधाव धावत आला. चंद्राच्या घोडेस्वाराच्या भाल्याने डॉनची ढाल उडवून दिली. डॉन खाली कोसळला आणि त्याचा घोडा शेपटी दाखवून मागे पळाला.

चंद्राचा सरदार डॉनच्या छातीवर पाय देऊन उभा राहिला आणि म्हणाला, "बोल, शरण येतोस का मरण देऊ ?"

डॉन म्हणाला, "तू मला जी अट घातली आहेस ती मी कबूल करतो. गाढवावर बसून मी माझ्या खेड्यात जातो."

चंद्राचा सरदार म्हणाला, "ठीक आहे, चल, त्या पलीकडल्या फुरफुरणाऱ्या गाढवावर बैस."

डॉन गाढवावर बसला. त्याच्या मागोमाग सँको चालू लागला. सरदार म्हणाला, "तुम्ही पुढे जा. मी थोड्या वेळाने येतो."

संध्याकाळच्या वेळी डॉन आपल्या खेड्यातील घरी आला. त्याची पुतणी धावत आली. तिने डॉनचे स्वागत केले डॉनने हातात टिकाव घेतला. आपल्या घराच्या बागेत एक खड्डा खणला आणि त्यात आपली ढाल आणि भाला या दोन वस्तू पुरून टाकल्या

रात्री डॉन पोटभर जेवला. त्याला शांत झोप लागली. तो सकाळी उठला. त्याने तोंड धुतले. त्याची पुतणी पाणी तापवीत होती. डॉन त्याच्या खोलीतील त्या कल्पनारम्य पुस्तकांच्या शेल्फाकडे पाहत होता. इतक्यात पुतणी म्हणाली, "काका, तुम्हांला काही-तरी खायला करणार आहे; पण घरात पुरेसे जळण नाही !"

डॉन म्हणाला, "थांब. माझे डोके फिरविणारी ही काही पुस्तके मी तुला देतो. यातील फक्त एकच पुस्तक मी ठेवणार आहे आणि ते म्हणजे बायबल !"

आपले काका सुधारले हे पाहून पुतणीला अतिशय आनंद झाला. इतक्यात त्या गावातील न्हावी आला. त्याने डॉनचे केस कापून अगदी लहान केले. त्याची दाढी स्वच्छ केली. तेव्हा डॉन शेतकरी दिसू लागला. इतक्यात त्या गावचा पंडित आला. तो म्हणाला, "नमस्ते, डॉन !" डॉन त्याच्या तोंडाकडे पाहू लागला. या पंडिताचा आवाज काल ऐकला आहे, असे डॉनला वाटले. तो म्हणाला, "पंडितमहाराज, माझे डोके आता शांत झाले आहे. मी आता सामान्य शेतकऱ्यांप्रमाणे काम करणार आहे. तुम्ही सांगाल तीच पुस्तके मी वाचीन. पण काय हो, काल मला भेटलेला चंद्राचा सरदार तुम्हांला माहीत आहे काय ? त्याने माझ्यात विलक्षण बदल घडवून आणला."

पंडित म्हणाला, "प्रिय मित्रा, रागावू नकोस. तो रणधीर सरदार आता तुझ्यापुढे उभा आहे. काल मी दाढी-मिशा लावून

BVBK-0402180

'शुभ्र चंद्राचा सरदार' झालो होतो. आज मी खेडेगावातील तात्या पंतोजी आहे." डॉन म्हणाला, "तू मला काही उपदेश कर."

इतक्यात त्या गावचा धर्मगुरू डॉनला भेटायला आला. तेव्हा पंडित म्हणाला, "हे धर्मगुरू तुला योग्य तो उपदेश करतील."

धर्मगुरू आलेला पाहून डॉन धावत पुढे गेला. त्याने आपल्या बोटांनें क्रॉसची खूण केली, धर्मगुरूपुढे गुडघे टेकले, मान वाकविली आणि तो म्हणाला, "महाराज, माझ्या सर्व चुका मला मान्य आहेत. मला पश्चात्ताप झाला आहे. भगवान ख्रिस्तांना मला क्षमा करायला सांगा आणि मला उपदेश करा."

धर्मगुरू म्हणाले, "डॉन, तू करुणेची ढाल एका हातात घे, प्रयत्नांचा भाला दुसऱ्या हातात धर आणि आपल्या खेडेगावाची सेवा कर. वृक्ष आणि वेली यांच्या ठिकाणी असलेल्या प्रभूला तू पाहा. कोणाचाही द्वेष करू नकोस. सगळ्या शत्रूंना क्षमा कर. खिळे ठोकणाऱ्या असुरांना देखील भगवान ख्रिस्ताने क्षमा केली. त्याप्रमाणे तू वागलास तर तुला समाधान मिळेल. 'जो शेजाऱ्यावर प्रेम करतो, तोच परमेश्वरावर प्रेम करू शकतो,' असे भगवान ख्रिस्त सांगतात. तुझे आयुष्य कारुण्याने उमललेले, प्रयत्नांनी रसरसलेले आणि मायेने प्रभावी झालेले असे होवो. भगवान ख्रिस्त तुझे कल्याण करोत."

हे शब्द ऐकून डॉनने खाली वाकून नमस्कार केला. आज डॉन क्विक्झोटचा नवीन जन्म झाला होता. त्याच्या डोळ्यांत ईश्वरी तेज दिसत होते. त्या घरातील सर्वांना आनंद झाला. त्या खेड्या-तील साऱ्या शेतकऱ्यांना आनंद झाला. तोच आनंद तुम्हाआम्हाला डॉनची ही कथा वाचून होवो. अशी ही डॉन क्विक्झोटची कहाणी संपूर्ण.

मुं. मं. ग्रं., वाचनालय शाखा.
२१८० दि. १५/८/